शुक्रवार, ५ जुलै २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ३००
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 5 JULY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-300 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



## विश्वविजेत्या संघाचे मायदेशी जंगी स्वागत

### दिल्ली विमानतळाबाहेर खेळाडूंना पाहण्यासाठी गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : ट्वेन्टी-20 विश्वचषक स्पर्धेच्या यंदाच्या जेतेपदावर नाव कोरल्यानंतर भारतीय संघ गुरुवारी सकाळी दिल्लीत दाखल झाला. यावेळी दिल्ली विमानतळाबाहेर विश्वविजेत्या टीम इंडियातील खेळाडुंना पाहण्यासाठी दिल्लीकरांनी रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड गर्दी केली होती. यानंतर भारतीय संघाचे खेळाडू काही काळ आयटीसी मौर्या हॉटेलमध्ये विश्रांतीसाठी थांबले होते. काही काळ विश्रांती केल्यानंतर टीम इंडियाचे खेळाडू हे 7 लोककल्याण मार्ग येथील पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानी गेले. तब्बल दीड तास भारतीय खेळाडुंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधला.**

यावेळी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टीम इंडियाची जर्सी भेट देण्यात आली. बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी आणि सचिव जय शहा यांच्याकडून नमो 1 असे लिहलेली जर्सी पंतप्रधान मोदी यांना भेट देण्यात आली. या जर्सीचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. पंतप्रधान मोदी यांची ही जर्सी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

भारतीय खेळाडुंनी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतल्यानंतर काहीवेळात एक व्हीडिओ प्रसिद्ध करण्यात आला. या व्हीडिओत पंतप्रधान नरेंद्र मोदी सर्व भारतीय खेळाडुंशी गप्पा मारताना दिसत आहेत. विराट कोहली, रोहित शर्मा, युजवेंद्र चहल यांच्यासोबत भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याशीही मोदींनी गप्पा मारल्या. या सगळ्यांनी पंतप्रधान मोदी यांना विश्वचषक स्पर्धेतील अनुभव सांगितले.

पंतप्रधान मोदी यांना भेटून टीम इंडिया मुंबईच्या दिशेने रवाना झाली आहे. मुंबईत विश्वविजेत्या भारतीय संघाच्या स्वागताची जंगी तयारी करण्यात आली आहे. दक्षिण मुंबईतील मरिन ड्राईव्हपासून ते वानखेडे स्टेडियमपर्यंत ओपन डेक बसमधून भारतीय खेळाडुंची विजययात्रा निघणार आहे. त्यासाठी मरिनड्राईव्ह आणि वानखेडे मैदानावर आतापासूनच क्रिकेटप्रेमींची गर्दी जमायला सुरुवात झाली आहे. वानखेडे मैदानात आल्यानंतर भारतीय संघावर 125 कोटी रुपयांच्या बक्षिसाची लयलूट करण्यात येणार आहे. त्यामुळे आता तमाम क्रिकेटप्रेमींचे डोळे मुंबईतील सेलिब्रेशनकडे लागले आहेत.

## महेश पाटील यांना उद्योग क्षेत्रात लक्षणीय कार्याबद्दल दैनिक आधुनिक केसरीचा 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर


आधुनिक केसरी न्यूज

**संजय व्यापारी**

**छत्रपती संभाजीनगर :** महेश दत्तात्रय



पाटील यांना त्यांनी उद्योग क्षेत्रातील केलेल्या प्रशंसनीय घौडदौडी बद्दल दैनिक आधुनिक केसरीचा आयडॉल महाराष्ट्र पुरस्कार जाहिर झाला आहे.




महेश पाटील यांचे शिक्षण बी. कॉम., डी.बी. एम. देवगिरी महाविद्यालय आणि मौलाना आझाद कॅालेज छत्रपती संभाजीनगर येथून झाल्यावर काही वर्षे कंपनीमध्ये नौकरी केली पण त्यांना स्वतःचा व्यवसाय करुन काही वेगळे करण्याची इच्छा होती म्हणून त्यांनी 2015 मध्ये रुद्रांश इंटरप्रायजेस नावाने एक छोटेसे युनिट सुरु केले. मुळातच अभ्यासू व मेहनत करण्याची तयारी व कोणतीही जोखीम पत्करण्याची तयारी असल्यामुळे त्यांनी या युनिटमधून व्यवसायास छान सुरवात केली. नवीन उद्योगाला सुरुवातीला ज्या अडचणी येतात त्या त्यांनाही आल्या, भांडवलासाठी लागणारे पैसे उभे करणे, पैसे देऊनही कच्चा माल लवकर न मिळणे, आपल्या प्रॉडक्ट साठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, अनुभवी कामगारांची कमतरता असे अनेक आव्हाने त्यांच्या समोर येवून उभी राहिली परंतू अतिशय संयमाने त्याला तोंड देत ही आव्हाने त्यांनी यशस्वी पणे स्विकारली व अल्पावधीतच त्यांच्यासाठी यशाचे दारे उघडली गेली. या युनिट द्वारे त्यांचा मार्केट बद्दल चांगला अभ्यास झाला व कोणत्या गोष्टीची कारखान्यांना जास्त गरज असते व त्या आपण तयार करुन पुरवू शकतो याचा अभ्यास करुन त्याप्रमाणेच 2020 मध्ये उद्योजक आणि मित्र श्री दासोपंत गोस्वामी यांच्या समवेत वाळूज इंडस्ट्रीमध्ये त्यांनी मोटो-टेक या नावाने मॅनुफॅकचरींग युनिट सुरु केले व हळू हळू व्यवसाय वाढवत त्यांनी गुणवत्तेच्या जोरावर आज भारतभर आणि विदेशात त्यांनी आपले प्रॉडक्ट पोहोचवले. त्यांच्या प्रॉडक्टसला आज सर्व ठिकाणांहून खूप चांगली मागणी आहे.

आज वाळूज येथे त्यांचे दोन प्लांट आहेत व त्या दोन युनिट मध्ये मिळून साधारण शंभरावर कर्मचारी व कामगार वर्ग आहे . त्यामधे महिलांची संख्या अधिक आहे. सर्व हाय टेक टेकनॉलॉजिचा वापर त्यांच्या युनिट मध्ये केला जातो. सर्व सेक्शन मध्ये स्वतंत्र मॅनेजर, क्वालिटी कंट्रोल, चोख सुरक्षा व्यवस्था आहे, लवकरच पुणे व गुजरात येथे प्लांट सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यात मार्गदर्शक आणि सहकारी मित्र श्री बाजीराव पाटील व श्री धनंजय मुर्कीकर आणि इतर मित्र व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य त्यांना लाभले आहे. 2024 मध्ये E.V.(इ-व्हेहिकल) चें शोरूम "क्रिपांजली मोटर्स"संभाजीनगर येथे सुरु केले ते युनिट त्यांच्या पत्नी सौ.क्रिपा व बहीण अंजली या पाहतात, महिलांनीही उद्योगक्षेत्रात जास्तीतजास्त यावे असे त्यांना वाटते.

सामाजिक कार्यात पण ते चांगला हातभर लावतात पण त्याची कोठेही प्रसिद्धी केलेली त्यांना आवडत नाही, प्लांटेशन करण्यावर ते जास्त भर देतात, हल्ली प्रदूषण वाढत चालले आहे नवीन कारखाने व कॉँक्रिट जंगल मुले प्रदूषण रोखण्यासाठी व निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सर्वांनी झाडे लावण्यावर व ते जागविण्यावर भर द्यावा असा त्यांचा आग्रह असतो. क्रिकेट, संगीत हे त्यांचे आवडते विषय आहेत. माणुस कितीही व्यस्त असला तरी आपल्या माणसा करिता त्यांच्या जवळ वेळ असलाच पाहिजे या मताचे ते आहेत. संबंध जपणे ही माणसाची प्राथमिकता आहे, ती प्रत्येकाने अवश्य जपली पाहिजे, आपल्या मोठे होण्यामागे आपल्या यशामागे आपल्या सोबत काम करणाऱ्या सर्व कामगार व कर्मचाऱ्यांचा आई वडील आणि कुटुंबाचा आपल्यापेक्षा जास्त वाटा असतो त्यामुळे ते आपल्या कर्मचाऱ्यांनाही आपली फॅमिली समजतात व त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असतात. त्यांचा देवावर खूप विश्वास आहे, आपण चांगले कर्म करीत राहावे चांगल्या कर्मांचे फळ नेहमी चांगलेच मिळते, कठोर मेहनत केल्याशिवाय यश जवळ करता येत नाही, आयत्या मिळालेल्या यशावर कधीही विश्वास ठेवू नये यश कमवावे तरच ते टिकते असे ते भावी पिढीस सांगतात.

MOTOTECH HARNESSING SOLUTIONS PVT LTD, E-MAIL: MAHESHPATIL@MOTOTECH.CO.IN

## अदानींना जमीन देण्यास विरोध केल्याने तुकाराम मुंढेंची बदली : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईतील मोक्याच्या जागा उद्योगपती गौतम अदानींच्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप कॉँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. पावसाळी अधिवेशनामध्ये (4 जुलै) विजय वडेट्टीवार यांनी आक्रमक शैलीमध्ये शिंदे सरकारवर मुंबईमधील जागांकडे लक्ष वेधताना घणाघती प्रहार केला. दुग्ध शाळेची जागा अदानींना देण्यास विरोध केल्यानेच सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली करण्यात आली, असा गंभीर आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.

ते म्हणाले की, मुंबईमधील मोक्याच्या जागा अदानींना दिल्या जात आहेत. दुग्ध शाळेची जमीन सुद्धा दिली जात आहे. ही जमीन 20 हजार कोटी रुपयांची असून त्याला विरोध केल्यानेच सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली करण्यात आली, असा गंभीर आरोप सुद्धा विजय वडेट्टीवार यांनी केला. ते पुढे म्हणाले की मुंबईसाठी अनेक हुतात्म्यांनी बलिदान दिलं आहे. अभिमान वाटावा अशीच मुंबई आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईकडे पाहिलं जातं. मात्र मिंधे सरकारने सरसकट जमिनी अदानींच्या घशात घालण्याचं काम केलं आहे. अंधेरी पुनर्विकास विकास पात्र अपात्र झाले नसताना सुद्धा अदानींच्या घशात जमीन घालण्यात आली. मोक्याच्या जागा त्यांच्या घशात घातल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याचेही ते म्हणाले. मुंबई अदानींकडे गहाण ठेवण्याची भूमिका घेतली असून त्याचा आम्ही निषेध करत असल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.

## संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी लोणंदनगरी सज्ज


आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दि.६ जुलै ते ८ जुलै या दरम्यान लोणंद ता.खंडाळा येथे येत असून पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी लोणंद नगरी सज्ज झालेली आहे.पालखी सोहळ्यासाठी नगरपंचायत लोणंद, महसूल विभाग,ग्रामविकास विभाग, महावितरण विभाग, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन या विभागांमार्फत पालखी सोहळा सुरक्षीत पार पाडण्यासाठी विविध कामे करण्यात आली आहेत.या नियोजना बद्दल सविस्तर माहिती लोणंद नगरपंचायत यांच्या कडून देण्यात आली.



जिल्हाधिकारी सातारा यांचे सुचनांनुसार नगरपंचायतीच्या वतीने पालखी तळावर मुरुमीकरण व कच टाकून संपूर्ण तळ सुस्थितीत करण्यात आला व खेमावती नदी संपूर्ण स्वच्छ करण्यात आली.तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या सूचना व आदेशानुसार नगरपंचायतीच्या वतीने जे.सी.बी,फरांडी ट्रॅक्टर,रोलर यांच्या साहाय्याने रहदारीचे रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे व बाभळीची झाडे काढून मुरुम टाकून सपाटीकरण करण्यात आले.श्री.संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याकरीता बाजारतळ येथील धोबीघाटाची संपूर्ण दुरुस्ती व स्वच्छता करण्यातआली. तसेच महिलांसाठी नवीन स्नानगृह बांधण्यात आले. तसेच संपूर्ण तळावर फ्लड लाईट,डेकोरेशन त्याच प्रमाणे विश्वस्तांच्या सल्ल्याने दर्शन रांगा व उन्हाची तिव्रता असल्याने दर्शन रांगेवरती सावली करण्यात येत असून दर्शन रांगेत मॅट टाकण्यात येत आहे व विविध सुविधा पुरविणारे कार्यालयास नियंत्रण कक्ष उभारण्यात आले.तसेच पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांचे सार्वजनिक शौचालयांसाठी १४ ठिकाणी नियोजन त्याठिकाणी स्वच्छता व विदयुत कनेक्शनची सोय करण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळ्यानिमित्ताने येणाऱ्या सर्व दिंड्यांच्या विसाव्याच्या ठिकाणी जे.सी.बी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने साफसफाई / स्वच्छता करण्यात आली. तसेच डासांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून फोगिंग मशिनव्दारे धूर फवारणी करण्यात आली आहे. आवश्यक ठिकाणी पोहच रस्त्यावर मुरुम टाकण्यात आला आहे.तसेच पाणीपुरवठा अंतर्गत सर्व पाणीपुरवठा टाक्यांचे निर्जतुकीकरण करणेत येत आहे.१) गांवठाण -आर.सी.सी.उंच टाक्या-४,२) जांभळीचा मळा ३) बेलाचा मळा ४) जलशुध्दीकरण केंद्र,पाडेगांव सर्व टेक मशीनद्वारे सफाई करून निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे.तसेच सर्व योजना यामध्ये पाडेगाव पंपींग मशीनरी, इले. मोटर्स २) इंदिरानगर ३) वेअर हाऊस ४) दगड वस्ती ५) बेलाचा मळा येथील सर्व इले. मोटर्सची तसेच सर्व पाणीपुरवठा योजनेचे व्हाल्व दुरुस्त करण्यात आले असून चेंबर बांधकाम करण्यात आले आहे.पाणी पुरवठा योजनेसाठी आवश्यक ती सर्व सामुग्री,खरेदी करण्यात आली आहे.तसेच पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक टि.सी.एल.तुरटी खरेदी करण्यात आली आहे. पालखी मुक्काम अडीच दिवस असल्याने शौचालयाच्या ठिकाणी पुरेशा पाण्याची व्यवस्था तसेच पाणी टंकर वेळेत, आवश्यक ठिकाणी पोहचतील याचे नियोजन करण्यात आले आहे.आरोग्य विभागाने गांवठाण अंतर्गत असलेली सर्व सार्वजनिक शौचालये दुरुस्ती केले आहेत. त्याचप्रमाणे गांवठाणमधील सर्व गटारांची सफाई नियमितपणे केली जात असून गटारालगतचे गवत काढण्यात आले आहे. पालखी काळात गटारावर डी.डी.टी.पावडर टाकण्यासाठी पावडर साठा उपलब्ध करुन ठेवण्यात आला आहे.मुतारी सफाई करण्यासाठी फिनेल, डांबर गोळ्या खरेदी करण्यात आले आहेत. नगरपंचायतीच्या वतीने पालखी तळावर सुलभ शौचालय उभारण्यात आले आहे.लोणंद गांवठाण व वाड्या-वस्त्यांवरील रोडलाईट्सची दुरुस्ती करण्यात आली असून गांवठाणमध्ये सर्व महत्वाचे चौकात कायमस्वरुपी फ्लड लाईट्स (हायमास्ट) व्यवस्था करण्यात आलेली असून गांवठाणसह वाडीवस्त्यावरील दिवे दुरुस्त केलेले आहेत.सार्वजनिक स्वच्छतेअंतर्गत गांवठाणमधील सर्व रस्त्याचे कडेची येडी बाभळीची झाडे काढण्यात आली आहे.खुल्या जागेतील स्वच्छता ट्रेक्टरचे राहाय्याने करण्यात आली असून रस्त्यावरील खड्डे मुरुम टाकून भरण्यात आले आहेत.याशिवाय माऊलीचे पालखी तळावर मदत केंद्र,आरोग्य विभाग, दवाखाना,पोलिस मदत केंद्र,अग्निशमन सेवा या सर्व अत्यावश्यक बाबीचे नियोजन करण्यात आले आहे. वारकरी स्नानासाठी पालखी तळावर स्नानगृह सुविधा उपलव्ध करण्यात आले आहेत.लोणंद पालखी तळावर पालखी आगमन होण्यापुर्वी निरा येथे पालखी सोहळा आल्यापासून पालखी सोहळा तरडगांव ता.फलटण येथून पुढे जाईपर्यंत दि.६,७ व ८ जुलै २०२४ अखेर दिंड्यांचे टँकर भरण्यासाठी नगरपंचायत विविध ठिकाणी तात्पुरती सोय फीडींग पॉईट करण्यात आले आहेत.तसेच पालखीतळ व शास्त्रीचौक येथे एल.इ.डी. स्क्रीन प्रत्यक्ष दर्शनासाठी लावनेत आल्या आहेत. नगरपंचायत लोणंद मार्फत माऊलीचे स्वागताचे नियोजन नगरपंचायत समोर सालाबादप्रमाणे करण्यात येत आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी





डॉ. शारदा या आईच्या आजारांसंबंधी, दिल्या जाणाऱ्या औषधांसंबंधी माहिती मिळवण्याचा प्रयत्न करायच्या. अर्थात निरनिराळी पुस्तके वाचून. त्यावेळी आजच्या सारखे इंटरनेट सुरु झालेले नव्हती. त्यामुळे ही माहिती मिळवणे तर कठीण होतेच, शिवाय ती समजणे त्यापेक्षाही कठीण. त्यासाठी डॉक्टर होण्याचीच आवश्यकता होती. डॉ शारदा यांच्या अमेरिकेतील एका मैत्रिणीचा इंजिनिअर असलेला नवरा नंतर वैद्यकीय शिक्षण घेऊन डॉक्टर झालेला होता. हे उदाहरण त्यांच्या डोळ्यांसमोर होते. आपणही असे डॉक्टर का होऊ नये या विचाराने त्यांच्या मनाचा ताबा घेतला आणि त्या दृष्टीने त्यांनी तपास करायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांच्या पदरी निराशाच पडली. सुरुवातीला तर लोकांनी वेड्यातच काढले. त्यांचं बारावी आर्टस् चे शिक्षण झालेलं होतं. वैद्यकीय शिक्षणासाठी बारावी विज्ञान पास होण्याची आवश्यकता होती. एकदा बारावी झाल्यावर पुन्हा बारावीच्या परीक्षेला बसता येणार नाही असं त्यांना सांगितलं गेलं. एच एस सी बोर्डात बराच पाठपुरावा केल्यानंतर त्यांना या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर मिळाले.

## हितगुज



पुष्प १०७वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

### स्वामींना दृष्टिआड होऊ न देणे हीच खरी सेवा

आपल्या अंतकाळी श्री स्वामी महाराजांचे स्मरण होणे म्हणजे अंतकाळ साधणे आणि हा साधण्यासाठी आधीपासूनच स्वामी महाराजांचे अखंड नामस्मरण करायला पाहिजे. सध्या आपण ज्या शरीरात राहतो ते भाड्याचे घर आहे. भाड्याचे घर सोडून स्वतःच्या मालकीच्या घरात राहायला जातांना जसा आनंद वाटतो तसाच शरीर सोडतांना वाटायला पाहिजे. भगवंताचे घर तेच आपले घर याची खात्री व्हायला पाहिजे. त्यासाठी सतत स्वामी महाराजांचे स्मरण करावे. महाराज सदैव आपल्या मागे पुढे आहेत असे मानावे. श्री स्वामी महाराजांचे स्मरण करणे, म्हणजे जे काही आपल्या हातून घडते आहे ते त्यांच्या इच्छेने घडते आहे असे समजणे. श्री स्वामी महाराजांशिवाय आपल्याला कोणी नाही याचा दृढनिश्चय झाला म्हणजे अखंड नामस्मरण सुरु होते. अंतकाळी ज्याने महाराजांचे स्मरण केले तो पुढच्या जन्मी अती सात्विक म्हणून जन्माला येईल. सात्विक म्हणजे 'परब्रम्हाची प्राप्ती करुन घ्यावी' अशी वृत्ती असणारा. अनंत जन्मांचा देहाशी सहवास, म्हणून देहावर प्रेम जडून देहबुध्दी होते, तसेच अखंड नामस्मरण केल्याने विषयाची आसक्ती कमी होऊन स्वामी महाराजांवर प्रेम जडते. योगात कष्ट फार, सेवेत कष्ट नसतात आणि सेवा करतांना अभिमान आपोआप गळत जातो. योग आणि कर्म ही साधने परमात्म्याच्या दत्तक पुत्राप्रमाणे आहेत तर सेवा हे साधन परमात्म्याच्या औरस पुत्राप्रमाणे आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांना दृष्टिआड होऊ न देणे हीच भक्ती, हेच खरे अनुसंधान, हाच खरा परमार्थ आणि हेच खरे आपले सर्वस्व आहे.

## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

त्यायोगे नाड्यांमध्ये मलाचा संचय होणार नाही व प्राणायाम सोपा होऊन नाड्यांमध्ये होईल, व चक्रांचा भेद होईल आणि योग्याला



अनाहत ध्वनी ऐकू येईल. कमी खाण्याप्रमाणेच साधकाने कमी बोलायला हवे. योग्याने वादविवादात कधीही भाग घेऊ नये. तसेच मूर्खांशी मैत्री करू नये. योग्याने हे सर्व नियम पाळून आपल्या कुंडलिनीला जाग आणून त्या महाशक्तीला ब्रह्मारंध्रामध्ये नेऊन बसवायला हवे. तसेच योग्याने आत्मस्थ होऊन प्राणायामाची साधना नियमितपणे करायला हवी. तसेच, शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी दर तीन-चार महिन्यांच्या अंतराने त्याने कायाकल्पही करायला हवा, इत्यादी. श्रीगोरक्षनाथांच्या ग्रंथांवरून त्यांच्या अशा तत्त्वज्ञानाची आपल्याला ओळख होते. गोरक्षनाथांच्या काळात भारतातील अनेक धर्मसंप्रदायांमध्ये वामाचार सुरू झाला होता आणि पंचमकरांना (मांस, मद्य, मैथुन इ.) प्रमाणाबाहेर महत्व प्राप्त झाले होते. स्वतःला साधक म्हणविणारे आपल्या वासनापूर्तीसाठी याचा सर्रास उपयोग करीत होते. याला पायबंद घालण्यासाठी गुरु गोरक्षनाथांनी साधनांची पवित्रता, शुद्ध चारित्र्य आणि संयमपूर्ण नीतिमान जीवनाचे महत्व आपल्या ग्रंथाद्वारे व उपदेशाद्वारे साधकांना पटवून देण्याचे फार मोठे कार्य केले, व स्वतःचाच आदर्श त्यांच्यापुढे ठेवला. त्यांचे दुसरे महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी शैव संप्रदायाचे संघटन करून तो संप्रदाय बलशाली केला, व त्यात नीतिमान, सदाचारी व संयमी साधक निर्माण केले. तसेच, त्यांनी या पंथात जातिभेद वा धर्मभेद कधीही मानला नाही. त्यांनी यवनांनाही तितक्याच मुक्तपणे आपल्या पंथात प्रवेश दिला. आद्य शंकराचार्यांनी मोक्षासाठी जसे ज्ञानमार्गाला प्राधान्य दिले तसेच गोरक्षनाथांनी त्याच ध्येयपूर्तीसाठी योगमार्गाला महत्व दिले. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ आधार 'सांख्यमत' हा असून 'पिण्डी ते ब्रह्माण्डी' या गोष्टीवर त्यांचा मुख्य भर आहे. आपल्या शरीरात सारे ब्रह्माण्डसूक्ष्म रूपाने वसत आहे असे त्यांच्या 'सिद्धसिद्धान्तपद्धती' या ग्रंथात स्पष्टपणे सांगितले आहे. मृत्यूनंतरची मुक्ती ही गोरक्षांच्या तत्त्वज्ञानात बसत नाही. मंत्रयोग, लययोग, हठयोग आणि राजयोग यांच्या साहाय्याने नाथयोगी आपल्या देहालाच शिवस्वरूप बनवून याच देही मुक्त होऊ शकतो नि यासाठीच षट्चक्रे, पंचआकाश, नवद्वारे इ. चे सम्यक् ज्ञान नाथयोग्याला असणे आवश्यक आहे. कुण्डलिनी जागृतीलाही नाथसंप्रदायात विशेष महत्वाचे स्थान आहे. कारण या कुण्डलिनीशक्तीच्या द्वारेच जीवशिव सामरस्याचा अनुभव नाथयोग्याला येतो. मात्र हा अनुभव गुरुकृपेवाचून मिळणे दुरापास्त असल्यामुळे नाथपंथात गुरुला अपरंपार महत्व आहे. अशा गुरुच्या ठिकाणी ३६ लक्षणे वा गुण असावयास पाहिजेत. एवढेच नव्हे, तर शिष्यातही ३२ लक्षणे वा गुण असल्यावाचून त्यास शिष्य होता येत नाही. या संप्रदायात शरीर हेच मोक्षप्राप्तीचे किंवा कैवल्यप्राप्तीचे साधन असल्यामुळे ते उपेक्षणीय समजले जात नाही.



आधुनिक केसरी

### होईन आनंदी | तुझ्या कृपे ||

नको मुखी निंदा | नको दुराचार ||
वृत्ती सदाचार | मनी वसो ||१||
असु दे तत्पर | दानधर्मासाठी ||
अहंकारापाठी | लावू नको ||२||
रूजावा अंतरी | सात्विक संस्कार ||
त्यावीन संसार | फळा न ये ||३||
वृक्षाचिया मुळा | पाणीयाचि ओढ ||
तैसे मना वेड | गोविंदाचे ||४||
तुझ्या नामे देवा | घालीन गवांदी ||
होईन आनंदी | तुझ्या कृपे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रथम देह की सुधि नहीं,
इन्द्रिन अर्थ अभाव ।
मन पंगू मर जात है, पूर्ण शान्ति सुख
पाव ।।४६।।(स्वर्वेद प्रथम मण्डल
तृतीय अध्याय) ०१/०३/४६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : विहंगम योगाच्या साधनेत धारणा सिद्ध झाल्यावर स्थूल शरीराचे भान रहात नाही, कारण इंद्रिये आपली कार्ये सोडून अंतर्मुख होतात. त्यामुळे त्यांच्या विषयांचा अभाव होतो. विषयांचा उपभोग न झाल्याने मन क्रियाहीन आणि पंगु होऊन मृतवत् होते. तेव्हा मनाच्या अभावामुळे आत्म्याला पूर्ण शांती आणि अत्यंत सुखाची प्राप्ती होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

मंत्राने पक्षी थांबवून ठेवता येतात. माणसं व जनावरे बांधून ठेवता येतात. मंत्राने धन लाभही करता येतो. वायु चे जसे चांगले उपयोग आहेत तसे वाईटही आहेत. म्हणून समर्थांनी आपल्याला समजेल अशा पध्दतीने सांगितले आहे. मनुष्य जन्म एकदाचं आहे वाईट कर्म केले तर चांगले होणार नाही कधीच वाईट दुष्कर्म करू नये. वाईट विचारांना थारा देऊ नये. म्हणून सतत सदाचाराने वागावे सात्विक वृतिने जीवन जगावे. पण ठकास महाठक व्हावे हे सांगायला समर्थ विसरले नाहीत. दुबळे पण होऊ नका. अशा रितीने देहान्त निरूपण नाम समाप्त झाला.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निरूपण


आधुनिक केसरी

पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५ ॥
गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे ।
कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ॥ ६६ ॥
तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी ।
म्हणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी । ६७॥
ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक ।
सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ॥ ६८ ॥
देवासी वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे ।
दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ॥ ६९ ॥
धडपुडी भगवत्प्राप्ती- । होऊन, चुके अधिगती ।

## देह हा देवाच्या प्राप्तीकरता आहे

आधुनिक केसरी


एकदा असे झाले, की एका साधूकडे चोरांनी चोरी केली. ते पळून जात असताना शिष्यांनी पाहिले, तेव्हा चोरांना धरून त्या शिष्यांनी खूप चोप दिला. हे त्यांचे करणे गुरूला समजले, तेव्हा त्या चोरांना आणून, गुरूने त्यांच्या अंगाला तेल वगैरे लावून स्नान घातले, आणि त्यांना पंचपक्वान्नांचे भोजन दिले. ' हे असे काय करता ? ' म्हणून शिष्यांनी गुरूला विचारले, तेव्हा त्याने शिष्यांना सांगितले की, " तुम्ही तरी काय करता ? सर्वचजण देवाच्या घरी चोरी करीत आहेत; कारण आपल्याला त्याने हा जो देह दिला तो देवाची प्राप्ती करून घेण्यासाठी म्हणून दिला, परंतु आपण ते न करता त्याच्यापासून विषय चोरतो आहोच की नाही ! म्हणून, विषयात आसक्ती न ठेवता आपण मनापासून देवाची भक्ती करावी. " आपण सर्वांनी ' मी भगवंताकरिता आहे ' असे मनाने समजावे. सर्व ठिकाणी भगवंतच भरलेला आहे अशी मनाची पक्की खात्री झाल्यावर, मग द्वैत आपोआप नाहीसे होऊन जी एकाग्रता साधते, तीच खरी समाधी होय. संत काय करतात ?



आपण चुकीची वाट चालत असताना, ' अरे, तू वाट चुकलास ' अशी जागृती आपल्याला देतात आणि खरा मार्ग दाखवितात. ते सदासर्वदा समाधिसुख भोगीत असतात, आणि नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. आपण एक दाणा शेतात पेरावा आणि त्याबद्दल हजार दाणे घ्यावे, ही भगवंताची लीला आहे. भगवंताच्या ठिकाणी जे जे आहे ते ते सर्व आपल्या ठिकाणी आहे. जसा मारुतीमध्ये देव-अंश होता, तसा तो आपल्यामध्येही आहे; त्याने तो फुलविला, आपण तो झाकून विझवून टाकला. मारुतीचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवावे. त्याचे ब्रह्मचर्य, भक्ती, दास्य आणि परोपकार करण्याची तऱ्हा या गोष्टी आपण शिकाव्यात. मारुती हा चिरंजीव आहे. ज्याची तशी भावना असेल त्याला अजूनही त्याचे दर्शन होईल. मारुतीला सर्व सृष्टी रामरूप दिसली. हेच खरे भक्तीचे फळ आहे. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. ' माझ्या देवाला हे आवडेल का ? ' अशा भावनेने जगात वागावे. हाच सगुणोपासनेचा मुख्य हेतू आहे. भगवंत दाता आहे, तो माझ्या मागे आहे, तो माझे कल्याण करणारा आहे, ही जाणीव झाली की, जे मिळाले ते भगवंताच्या इच्छेने मिळाले ही भावना होऊन, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधान मिळेल. समाधान आणि आनंद हीच खरी लक्ष्मी होय. आपली वृत्ती अशी असावी की, कुणाला आनंद पाहिजे असेल तर त्याने आपल्याकडे धाव घ्यावी. इतर संपत्ती कितीही दिली तरी पुरी पडत नाही, पण वृत्तीचा आनंद देऊन कधीच संपत नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ५ जुलै २०२४
adhunikkesari.com

# ताईसाहेबांना विधान परिषद मिळाली, पण यापेक्षा मोठं नेतृत्व करण्याची संधी मिळावी : नरसिंग सिरसाट



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांची विधान परिषदेवर उमेदवारी जाहिर झाल्यानंतर केवळ बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील काना कोपऱ्यातल्या हितचिंतक तथा अठरापगड जातीधर्माच्या सामान्य लोकांना कमालीचा आनंद वाटला. मात्र विधान परिषद हे आमच्या नेतृत्वासाठी मिळालेली संधी आनंदाची गोष्ट असली तरी ताई साहेबांनी यापेक्षा मोठं होवुन संपुर्ण महाराष्ट्राचे नेतृत्व करावं अशा प्रकारची भावना परळीतुन आलेले कडवे समर्थक नरसिंग सिरसाट उर्फ सावकार यांनी बोलुन दाखवली. ज्यांच्या नेतृत्वात परिवर्तनाचं बळ आणि सामान्य लोकांच्यासाठी आशेचा किरण गोरगरिबांना वाटतो असं नेतृत्व याहुन अधिक मोठं व्हायला हवं.

पंकजाताईच्या येथील वरळी स्थित निवासस्थानी तीन दिवसापासुन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन भेटण्यास येणाऱ्याच्या गर्दीत तुफान वाढ झाली. मागच्या पाच वर्षापासुन राजकिय प्रतिष्ठा मिळण्याचे सामान्य लोक वाट पहात होते. तो क्षण आता जवळ आला. पक्षानं विधान परिषद उमेदवारी पहिल्या क्रमांकात त्यांना दिली. कदाचित भविष्यात मोठी राजकिय जबाबदारी देखील त्यांच्यावर येवु शकते यात तिळमात्र शंका नाही. कारण राजकिय संघर्ष पण त्यानंतर एक दिवस सुख आणि प्रतिष्ठा हा नियतीचा नियमच आहे. बीड जिल्ह्यातुन मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येताना दिसतात.

वास्तविक पहाता लोकसभा निवडणुकीत ज्यांनी खिशात हात घातले यातले काही चेहरे सर्वात अगोदर स्वागतासाठी पहिल्या क्रमांकावर दिसले तो भाग वेगळा. मात्र नरसिंग सिरसाट ज्यांना सावकार म्हणुन परळीत ओळखल्या जातं. पंकजाताईचे कडवे समर्थक असंही म्हणता येईल. नगर परिषद, बाजार समिती, अशा अनेक निवडणुका त्यांनी लढवल्या. तळमळीचा कार्यकर्ता, निष्ठेचा भोक्ता यातुन त्यांच्याकडे पाहिल्या जाते. संघटन आणि मित्र कसे जोडावेत ?ही राजकिय कला त्यांच्याकडे आहे. आमच्या प्रतिनिधीसोबत त्यांची कार्यालयात भेट झाली. ते म्हणाले, आज आमचं स्वप्न साकार होतंय याचा मनस्वी आनंद आम्हा होतच आहे पण एवढीच आम्हासारख्याची भुक नव्हे. कारण पंकजाताई हे नेतृत्व अठरापगड जातीधर्माच्या लोकांना सोबत घेवुन चालतं. स्वाभिमानाचं राजकारण करताना मोठ्या साहेबांचा वारसा चालवताना उपेक्षित, वंचित, शेतकरी, कष्टकरी, सामान्य जनतेची सेवा त्यांनी केली. लोक कल्याणाची दिशा त्यांच्या नेतृत्वात आहे. प्रामाणिक नेतृत्व आणि पारदर्शी राजकारण यातुन आमच्यासारख्याला काम करण्यासाठी ऊर्जा मिळते. लोकसभेत झालेला पराभव नैतिकदृष्ट्या आमचा विजयच म्हणावा लागेल. ज्यांनी गद्दारी केले, असे चेहरे उघडकीस आले. पण असं असलं तरी विधान परिषदेच्या माध्यमातुन ताईसाहेबांचा सन्मान वाढला. तो मनस्वी आनंद आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला झाला. मात्र यापेक्षा अधिक जबाबदारी त्यांच्यावर येण्याची गरज वाटते. कारण सामान्य जनतेच्या कल्याणासाठी त्यांचे नेतृत्व उपयुक्त असुन यापेक्षा मोठी जबाबदारी त्यांच्याकडे यावी असं देखील त्यांनी म्हटलं. आपण तीर्थक्षेत्र अक्कलकोट, गाणगापुर आणि पंढरपुर, शिर्डी आदी देवस्थानाला ताईसाहेबांसाठी नवस बोलले असुन इच्छा पुर्ण झाल्याने आम्ही श्रद्धाही पुर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.सिरसाट हे सारांश अर्बन बँकेचे चेअरमन पदावर काम पहातात.

## चंद्रपूर मनपा उपद्रव शोध पथकाची कारवाई; १५ किलो प्लास्टीक जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिका उपद्रव शोध पथकास मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे श्याम नगर परिसरातील उगेमुगे पान सेंटर या दुकानावर धाड टाकुन १५ किलो खर्रा पन्नी प्लास्टीक जप्त करण्यात आले असुन ३ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

सदर कारवाई आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त मंगेश खवले यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात डॉ.अमोल शेळके यांच्या उपस्थितीत उपद्रव शोध पथकाद्वारे करण्यात असुन सदर दुकानदारास पुन्हा प्लास्टीक आढळल्यास पोलीस तक्रार करण्याची सक्त ताकीद देण्यात आली आहे. प्लास्टीक बंदीसाठी मनपा मार्फत " उपद्रव शोध पथक " ( NDS ) तयार करण्यात आले असुन सदर पथकाद्वारे पालिका क्षेत्रातील सर्व प्रतिष्ठाने, दुकानांवर कारवाई सुरु आहे.दरम्यान प्लास्टीक पिशव्यांची माहीती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असुन दिलेली माहीती खरी निघाल्यास ५ हजारांचे बक्षिस दिल्या जाणार आहे.  एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तूंचे उत्पादन, आयात, साठवणूक, वाहतूक, वितरण, विक्री व वापरावर राज्यात १ जुलै २०२२ पासून पूर्णपणे बंदी घालण्यात आली असुन महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अधिसूचना २०१८ नुसार पाचशे रुपये जागेवरच दंड, संस्थात्मक पातळीवर ५ हजार रुपयांपर्यंत दंड,दुसऱ्यांदा वापर केल्यास १० हजार रुपये, तर तिसऱ्यांदा गुन्हा केला तर २५ हजार रुपये दंड आणि ३ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा आहे.

चंद्रपूर महानगरपालिका हद्दीत प्लास्टीक पिशव्यांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यास दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक विपीन पालीवाल यांनी दिलेले असुन प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाअंतर्गत मनपाच्या तीनही झोननिहाय कारवाईत संयुक्तपणे मोहीम राबवून शहरातील व्यवसाय प्रतिष्ठाने, दुकाने यांची कसून तपासणी करण्यात येत आहे.





## संजय राऊतांची टीका

आधुनिक केसरी

उत्तर प्रदेशच्या हाथरसमध्ये भोले बाबा नामक बाबाने भरविलेल्या सत्संगमध्ये चेंगराचेंगरी होऊन १२१ लोकांचा बळी गेला. या दुर्घटनेवरून शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली आहे. “या देशाचा पंतप्रधानच सर्वात मोठा बुवा आहे. भोंदुगिरी तिथूनच सुरू होत आहे. देशाच्या पंतप्रधानांनी एका पंतप्रधानाप्रमाणे वागले पाहीजे. तुम्ही गुहेत जाऊन तपस्या करून स्वतःला बुवा म्हणवून घ्याल. तुम्ही स्वतःला देवाचा अवतार म्हणवून घ्याल. तुम्ही हिंदू आणि मुसलमान कराल, ही भोंदूगिरीच आहे. देशाच्या पंतप्रधानांनाच जर भोंदुगिरीतून राजकारण करायचे असेल, तर इतरांना काय सांगणार? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ४० आमदार घेऊन आसामला जातात आणि कामाख्या देवी मंदिरात रेडे कापतात. त्यांच्यावर कोण कारवाई करणार? कायद्याने यांच्यावर कारवाई व्हायला हवी”, अशी टीका संजय राऊत यांनी केली. संजय राऊत पुढे म्हणाले, हाथरसमध्ये सत्संग भरविणाऱ्या भोले बाबावर योगी सरकारने गुन्हा दाखल केलेला नाही. ८० हजार जणांची सत्संगाला परवानगी असताना त्याठिकाणी अडीच लाख लोक जमले होते. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा आहे. मागच्या काळात खारघरमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राज्य मंत्रिमंडळाच्या उपस्थितीत २५ लोकांचा चेंगराचेंगरीत बळी गेला होता. खारघर आणि हाथरसमधील बळी हे अंधश्रद्धेचे बळी असून त्याला सरकार खतपाणी घालत आहे. या बुवा आणि महाराजांना राज्यकर्ते प्रतिष्ठा देत असतात. त्यामुळेच अशाप्रकारच्या दुर्घटना घडत असतात. लोक हतबल आहेत. गरीबी आणि महागाईमुळे ते पिचलेले आहेत. त्यामुळे ते भोंदुबाबाकडे जातात. नरेंद्र मोदी यांना मिळालेली मते ही भोंदूगिरीतून मिळालेली मते आहेत, असा आरोप संजय राऊत यांनी केला. भाजपाच्या काळात अंधभक्त निर्माण झाले आहेत. पंतप्रधान स्वतःला देवाचा अवतार मानतात. त्यांचा जन्म जैविकदृष्ट्या झालेला नाही, असे तेच सांगतात. जर पंतप्रधानच असे वागत असतील तर देशात अंधश्रद्धेला खतपाणी घातले जाईल.

## शरद पवारांचे पाय वारीच्या दिशेने कसे?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**फुटलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार तसं पाहता राजकिय फायद्यासाठी कोणत्या वेळी काय बोलतील?आणि कोणत्या प्रकारची भुमिका घेतील? तो अंदाज कुणालाच आलेला नाही. पावसात भिजलं तर लोक आपल्याला मतदान करतात या भुमिकेत देखील मागे राहिले नाहीत. आश्चर्य याचं वाटतं की एका विशिष्ट वर्गसमुदायाची मतं मिळवण्यासाठी त्यांनी नेहमीच हिंदुत्ववाद्यांचा अर्थात वारकऱ्यांसह द्वेष केला. कारण ज्यांच्या कर्मभुमीतुन पंढरपुर आषाढी वारी जाते, उभ्या आयुष्यात त्या पवारांचे पाय ना ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीला ना संत तुकाराम महाराजांच्या पालखीला लागले.**

साहेब वारीत पायी चलणार या बातम्या त्यांनीच माध्यमात छापुन आणल्या आणि मी वारीत पायी चालणार नाही असं तिरस्काराचं बोलणं देखील त्यांनीच माध्यमासमोर बोलुन वारी भक्तांचा अपमान केला. ज्या राहुल गांधींनी देशाच्या संसदेत हिंदु समाज हिंसक, हिंसक, हिंसक असं म्हणत अपमानित केला त्याच राहुल गांधीला केवळ विधानसभा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवत वारीत येण्याचं पवारांचं निमंत्रण यावरूनच सोंगढोंग कसे यांचे असतात? ज्याला राजकिय गोंधळी असंही म्हणता येईल.

शरद पवारांच्या राजकिय ज्ञानाला तोड आहे का? कदाचित याचे उत्तर नाही असंच म्हणता येईल. कारण वर्षानुवर्षे राज्यात आणि केंद्रात सत्तापदे भोगणाऱ्यापैकी ते एक आहेत. यशवंतराव चव्हाणांचा वारसा सांगत त्यांनी राजकिय वाटचाल चालु ठेवली. पण त्याच काळात काँग्रेस नेता कै.वसंतदादा पाटलांच्या कंबरड्यात राजकिय लाथ मारून मुख्यमंत्री पदाची खुर्ची हस्तगत केली. हा इतिहास देव जाणे काँग्रेसवाले विसरतात कसे? पण जेव्हा पक्ष संकटात सापडतो त्यावेळी नेतृत्व आणि कार्यकर्त्यांना परस्पर विचाराची गरज असते. ज्या पवारांनी सोनिया गांधीला परदेशी म्हणुन पंतप्रधान होवु दिलं नाही, अलीकडे राहुल गांधींच्या नेतृत्वावर देखील आक्षेप घेतला होता. त्या पवारांच्या भोवती मधमाशासारखे काँग्रेसवाले आज घोंगावताना दिसतात तो भाग वेगळा. ज्यांनी साहेबांचं राजकारण जवळुन पाहिलं, ते लोक बोलुन दाखवतात की पवार साहेब दांभिक,धर्मनिरपेक्षवादी ज्यांनी हिंदु रूढी, संस्कृती, परंपरेला कधीच जवळ केलं नाही. पन्नास वर्षाच्या इतिहासात कुठल्याही मंदिरात साहेब अभिषेक करताना लोकांना पहायला मिळाले नाहीत. याउलट मी नास्तिक आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी अनेकदा भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या वेगवेगळ्या मंदिराची देखील हेटाळणी केल्याच्या घटना लोकांनी पाहिल्या. जरा मागे वळुन पाहिलं तर पंढरपुरची आषाढी वारी ज्याला इतिहास अनादि वर्ष काळाचा पण आळंदीहुन निघालेल्या वारीचा प्रवास शरदचंद्र पवारांच्या अर्थात साहेबांच्या कर्मभुमीतुन नव्हे तर जन्मभुमीतुन देखील वर्षानुवर्षापासुन होतो. मात्र असं कधी आयुष्यात दिसलं नाही की, साहेबांनी वारीचं रस्त्यावर येवुन जोरदार स्वागत केलं. ना संत ज्ञानेश्वर पालखीचं, ना कधी तुकाराम पालखीचं. याउलट अशा वारी सोहळ्यापासुन आपण कसे दुर आहोत? एवढेच नव्हे तर दांभिक आपला चेहरा एव्हाना मताचं लांगुनचालन करण्यासाठी त्यांनी कधीच हिंदु धर्माच्या रूढी, परंपरा, संस्कृतीला महत्व दिलं नाही. अर्थात राजकिय फायदा घेण्यासाठी जातीपातीचा आधार नेहमीच घेत आले. खरं तर आज मराठा आरक्षणाचा प्रश्न ज्या पद्धतीने समोर आला, तो मार्गी न लावण्यात हे साहेबच जबाबदार असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण वर्षानुवर्षे यांच्या हाती सत्ता त्यांनी कधीच पुढाकार घेतला नाही. हं, राजकिय फायद्यासाठी अलीकडे त्यांचे येणारे वेगवेगळे स्टेटमेंट तो त्यांचा स्वभावाचा मुळ अजिंडाच म्हणावा लागेल. काही तरी खळबळ उडवुन द्यायची आणि प्रसारमाध्यमाची हवा आपल्याभोवती कशी राहिल? याची काळजी आयुष्यात त्यांनी नेहमीच घेतली. उदाहरण सांगायचं झालं तर साहेब आषाढी वारीत चालणार अशा बातम्या त्यांनीच खऱ्या अर्थाने माध्यमात छापुन दोन-चार दिवस चालवल्या. भाविक भक्तांना देखील आश्चर्य असं वाटलं की कधी नव्हे ते दांभिक असलेले साहेब वारीत कसे येवु लागले? अनेक वारकऱ्यांच्या अंगावर काटा देखील आला. कारण त्यांच्यासोबत वारीत चालायचं म्हणजे राजकिय भक्ती म्हणुन लोटांगण घेण्यासारखं पण काल-परवा जेव्हा माध्यमांनी पवारांना तुम्ही वारीत जाणार का? विचारलं त्यावेळी सपशेल मी वारीत जाणार नाही अशा तिरस्कारी भावनेतुन त्यांनी प्रतिक्रिया दिली. खरं तर हा वारकऱ्यांचा देखील अपमानच म्हणावा लागेल. कारण एवढ्या मोठ्या राजकिय नेत्यांनी तेही ज्यांच्या कर्मभुमीतुन वारी जाते, त्यांनी मी वारीत जाणार नाही ज्या आविर्भावात भुमिका प्रकट



केली तो भाव केवळ एका विशिष्ट वर्ग समुहाच्या मतदार लांगुनचालनासाठी होता हे देखील लपुन राहिलं नाही. तो कुणासाठी असावा? भाविक भक्तांना देखील कळुन चुकलं हा भाग वेगळा. खरं तर पवार साहेब वारीत येणार नाहीत असं म्हटल्याबरोबर वारकऱ्यांनीच कदाचित सुटकेचा श्वास टाकला असेल? पण काल-परवा त्यांनी म्हणे काँग्रेस नेते राहुल गांधीला वारीत येण्याचं निमंत्रण दिलं. अर्थात साहेबांना निमंत्रण देण्याचा नैतिकदृष्ट्या अधिकार आहे काय? पण पुन्हा अगोदर म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र विधानसभा निवडणुक डोळ्यासमोर ठेवुन दिलेले निमंत्रण वारकऱ्यांची देखील चेष्टा करण्यासारखंच होय. संसदेत राहुल गांधी विरोधी पक्ष नेता पदावर बसल्याबरोबर त्यांनी पहिला वार देशातील हिंदु समाजाच्या मानगुटीवर टाकला. हिंदु समाज हिंसक, हिंसक, हिंसक असं म्हणत त्यांनी समस्त हिंदु समाजाची संसदेत हेटाळणी केली. खरं तर संवैधानिक पदावर बसलेल्या नेतृत्वाने असं बोलणं गाढवपणाचं लक्षण होय. पण त्यांचं पोरकट राजकारण देशातील जनतेला माहित असल्याने त्यांच्याकडून असंच वर्तन अपेक्षित. गंमत अशी आहे की ज्यांनी हिंदु समाजाला हिंसक म्हटलं त्या राहुल गांधीला वारीत येण्याचं निमंत्रण मोठे साहेब देतात. यावरून विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी कशा प्रकारे किती नाटकं ही मंडळी करते? हा चेहरा देखील महाराष्ट्रातील जनतेच्या नजरेस आला. कदाचित राहुल गांधी उद्या आषाढी वारीत बारामतीच्या कर्मभुमीतच कुठेतरी चार पावलं चलतीलही त्यांचं स्वागत साहेब करतील हा सारा राजकिय नाट्याचा खेळ घडुन जाईल यात शंका नाही. प्रश्न हा पडतो की ज्या आषाढी वारीत पुर्णतः हिंदु भाविक भक्त आनंदाने माऊलीचा गजर चालतात तेच हिंदु राहुल गांधीला हिंसक वाटतात कसे? आणि त्यांच्या पदस्पर्शाने पुन्हा आषाढी वारीची विटंबना हे खऱ्या अर्थाने राजकिय सोंगढोंग होय. राहुल गांधीनं देखील हिंदुत्वाच्या भावनेवर आजवर अनेकदा हातोडे घातलेले लोक अद्याप विसरलेले नाहीत. सत्तेमध्ये सर्वाधिक काळ खऱ्या अर्थाने शरद पवारांसह काँग्रेसवाल्यांचा राहिलेला असुन त्यांनी महाराष्ट्रात आषाढी वारीच्या बाबतीत विकासात्मक कधी पाऊल उचलले नाही. एव्हाना तीर्थक्षेत्र पंढरपुरच्या विकासासाठी देखील ठोस पाऊले उचलले नाहीत. याउलट भाजपाने सत्तेत आल्यानंतर संपुर्ण राज्यात पालखी मार्ग तयार केले. चकचकीत रस्ते आणि वारकऱ्यांच्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध सद्या सरकार देखील करून देताना दिसतं. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, भाजपाचे सर्व मंत्री कुठे ना कुठे वारीत सहभागी झालेले दिसतात. परवा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे स्वतः आळंदीत वारीचा शुभारंभ करण्यासाठी येवुन गेले. प्रश्न हाच पडतो की,शरद पवारांनी राहुल गांधीला वारीत येण्यासाठी दिलेले निमंत्रण राजकिय सोंगाढोंगाचा भाग म्हणावा लागेल हे मात्र नक्की.

## आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२१५

आधुनिक केसरी

**आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो.**

ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रमाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात. वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण! मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ



नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा द्यावी

## कन्नड येथे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवाली सराटी या ठिकाणी ज्या ज्या घरी राहतात त्या त्या ठिकाणी व आंदोलन स्थळाची वाईट उद्देशाने व घातपात करण्याच्या हेतुने हेरगिरी व पाळत ठेवण्याचा प्रकार असण्याची दाट शक्यता आहे. करोडो मराठा बांधवान मध्ये मनोज जरांगे पाटील विषयी चिंता व रोष व्यक्त होत आहेत. जरांगे पाटील मराठा समाजाचे मोठे नेतृत्व असल्याने सर्व समाज पाटिल यांच्या सुरक्षेच्या काळजीपोटी भावनिक होत म्हणुनच त्यांना झेड प्लस सुरक्षा दयावी या साठी कन्नड येथील मराठा बांधवांनी नायब तहसीलदार दिनेश राजपुत यांना निवेदन दिले. यावर सुरेश चव्हाण, रामकृष्ण मोहिते, विजय भोसले, राजधर सोनवणे, संतोष निळ, संतोष पवार, रुषी आवाळे, राम पवार, शेखर शिंदे, सचिन काळे, गोरख, सुभाष बोडखे प्रविण आल्हाड इत्यादी मराठा बांधवांच्या सहया आहेत.

# पंढरपुरात अतिक्रमण हटाव मोहीम

आधुनिक केसरी न्यूज



**सोलापूर :** क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात गर्दी झाल्याने उत्तर प्रदेशातील हाथरस येथे भोलेबाबा यांच्या सत्संगावेळी चेंगराचेंगरी झाली. त्यामध्ये 121 जणांचा बळी गेला. आता पंढरीच्या वारीपूर्वीच प्रशासनाने सावधगिरी बाळगली आहे. हाथरस दुर्घटनेतून धडा घेत पंढरीत प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात केली आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर होणारी गर्दी लक्षात घेत येथील परिसर विस्तीर्ण करण्यासाठी प्रशासन पाऊलं उचलत आहे. मात्र, या कारवाईवर व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. आषाढीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नोटीस न देता अतिक्रमण हटाव मोहीम सुरु केल्याने व्यापारी संतप्त झाले आहेत. उत्तर प्रदेशच्या हाथरस येथील चेंगराचेंगरीची दुर्घटनेनंतर प्रशासन खडबडून जागे झाले असून आषाढीच्या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी असणारी अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली आहे . नगरपालिकेने आज पोलीस प्रशासनासह प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली.

मात्र, व्यापाऱ्यांना कोणतीही नोटीस न देता अतिक्रमण केल्याने व्यापारी संतप्त झाले आहेत. नगरपालिका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज या अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात झाली. यावेळी प्रांताधिकारी, डीवायएसपी, नगरपालिका मुखयधिकारी यांचेसह 100 पेक्षा जास्त कर्मचारी, जेसीबी आणि टेम्पोसह रस्त्यावर उतरल्याचं दिसून आलं.

या मार्गावरील व्यापाऱ्यांनी पाऊस आत येऊ नये यासाठी लावलेल्या पाणसळ तोडून टाकण्यास सुरुवात केल्याने व्यापारी आक्रमक झाले. यातच पाणसळ तोडताना व्यापाऱ्यांची लोखंडी शटर देखील उचकटून आल्याने या गोरगरीब व्यापाऱ्यांना हजारो रुपयाचा भुर्दंड बसला आहे. एकाबाजूला शहरात प्रत्येक प्रमुख मार्गावर राजकीय आशीर्वादाने शेकडो खोके, टपऱ्या आणि कार्यालये सुरु असताना यावर कारवाईचे धाडस मात्र प्रशासन दाखवत नसून गोरगरीब व्यापाऱ्यांच्या दुकानावरील पत्रे तोडत असल्याने व्यापारी संतप्त झाले आहेत. प्रशासनाने आम्हाला नोटीस दिल्या असत्या तर आम्ही स्वतः दुकानावर निवाऱ्यासाठी लावलेली पाणसळ हटविल्या असत्या, अशी संतप्त भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली.

दरम्यान, बेकायदा टपऱ्या आणि खोक्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देणे टाळत प्रशासनानेही ही मोहीम सुरु ठेवली आहे. आता ज्या पद्धतीने शहरातील व्यापाऱ्यांवर अतिक्रमणाची कारवाई झाली, तशी राजकीय आशीर्वादाने शहरात असणाऱ्या बेकायदा अतिक्रमित इमारती, खोके आणि टपऱ्या हटविण्याची मागणी व्यापाऱ्यांची आहे .

सिकंदराबादच्या फुलरई गावात भोलेबाबा नावाच्या महाराजाचा सत्संग आयोजित केला होता. आणि याच सत्संगानंतर, या बाबाच्या पायाखालची माती घेण्यासाठी जत्थेच्या जत्थे धावले आणि मोठी दुर्घटना घडली. सत्संगासाठी 80 हजार जणांची परवानगी असतानाही त्या दिवशी 2.50 लाख भाविक जमले होते. सत्संग संपल्यावर भोलेबाबाची चरणधूळ गोळा करण्यासाठी पळापळ झाली. चरणधुळीसाठी अनेक जण बसलेल्यांच्या अंगावरून धावत गेले. यामुळे अनेक जण खाली पडले, त्यांच्या अंगावरून लोक जात राहिले. काही क्षणांत या पळापळीचं चेंगराचेंगरीत रुपांतर झाले. पुढच्या बाजूने सत्संग समितीचे लोक भाविकांना रोखत होते. त्यामुळे मागे गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरीची तीव्रता आणखी वाढली. या दुर्देवी घटनेमध्ये जीव गुदमरून 121 जणांचा मृत्यू झाला, यामध्ये 100 पेक्षा जास्त महिलांचा समावेश आहे. अनेकजण यामध्ये जखमीही झाले.



# पॉलिटेक्निक महाविद्यालयातून विद्यार्थी पैकीच्या पैकी गुण घेऊन महाराष्ट्रातून अव्वल

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** एम. एस. बी. टी. ई. द्वारा घेण्यात आलेल्या उन्हाळी 2024 परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून उत्कृष्ट व नेत्रदीपक निकालाची परंपरा कायम राखत आपलाच विक्रम मोडित काढत इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) कन्नड ने एक आदर्श प्रस्थापित केला आहे. महाविद्यालयातून सुमारे 36 विद्यार्थी बोर्ड परीक्षेत विविध विषयात पैकीच्या पैकी गुण घेत संयुक्तरित्या गुणानुक्रमे महाराष्ट्रातून पहिले आलेत तर तृतीय वर्ष मेकॅनिकल विभागाचा विद्यार्थी विशाल कैलास पवार हा 94.56% गुण घेत महाविद्यालयातून प्रथम झळकला. महाविद्यालयातील चारही विभागाचा निकाल उत्कृष्ठ असून वर्गनिहाय निकाल पुढीलप्रमाणे

**1) सिव्हिल विभाग प्रथम वर्ष –** प्रथम - दांडगे किरण कारभारी (85.70) द्वितीय - कु. शिंदे चंचल काकासाहेब (80.44) तृतीय - कु. पवार स्वराली संदीप (76.44) **द्वितीय वर्ष –** प्रथम - कु. दुलत प्रतीक्षा प्रतापसिंह (88.75) द्वितीय - कु. दुलत तनुजा पदमसिंह (85.25) तृतीय - कु. अदमाने दिव्या रमेश (80.38) **तृतीय वर्ष –** प्रथम - कु.निंभोरे प्रज्ञा संजय (90.74) द्वितीय - राठोड आश्विनकुमार मच्छिंद्र (90.58) तृतीय - कु. शेजवळ गौरी अशोक (88.16)

**2) मेकॅनिकल विभाग**
प्रथम वर्ष - प्रथम - ठोंबरे प्रतीक गोरख (83.37) द्वितीय - मिसाळ स्वप्नील अशोक (79.89) तृतीय - राठोड राकेश ताराचंद (76.11)
**द्वितीय वर्ष –** प्रथम - मुठ्ठे विकास रावसाहेब (91.88) द्वितीय - भागवत राहुल दिलीप (80.25) तृतीय - जाधव रोहन पंडित (75.38)
**तृतीय वर्ष –** प्रथम - पवार विशाल विकास (94.56) द्वितीय - घुले शिवप्रसाद सुभाष (88.67) तृतीय - कोठारी अझीझ तसद्दुकहुसैन (87.33)

**3) कॉम्प्युटर विभाग**
प्रथम वर्ष - प्रथम - कु. वाळुंजे प्रतीक्षा प्रदीप (90.00) द्वितीय - मराठे आदित्य रामकृष्ण (86.47) तृतीय - श्रीवास्तव हितेन किरण (86.00)
**द्वितीय वर्ष –** प्रथम - कु. चुंगडे पायल सुनील (88.80) द्वितीय - कु. पवार हर्षदा वैजनाथ (88.00)
तृतीय - कु. नीलाखे गौरी मुकुंद (86.93)
**तृतीय वर्ष –** प्रथम - शर्मा हरी मनोजकुमार (92.17) द्वितीय - पठाण हूझेफखान मुकिदखान (90.17)
तृतीय - खंडेलवाल कृष्णा देवेंद्र (87.83)

4) इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभाग **प्रथम वर्ष –** प्रथम - कु. वाळूंजे श्रद्धा विश्वास (88.71) द्वितीय - कु. पवार भाग्यश्री आबासाहेब (82.44)
तृतीय - कु. उधार राजश्री रामेश्वर (78.00) **द्वितीय वर्ष –** प्रथम - कु कदम अश्विनी ज्ञानेश्वर (87.11)
द्वितीय - कु. दळवी वेदिका अर्जुन (84.56) तृतीय - कु पटेल झिल मनसुखलाल(82.78)
**तृतीय वर्ष –** प्रथम - इलंबीलाई अनुष संजीवन (89.07) द्वितीय - काळवणे गोकुळ कृष्णा (88.46) तृतीय - कु. पवार साक्षी सुरेश (87.06)

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष प्रा किशोर पाटील, सरचिटणीस अड. प्रसन्ना पाटील, संचालक श्री. सिद्धार्थ पाटील, श्री विश्वासराव मोतिंगे बापू, प्राचार्य डॉ.अभय चौधरी, उपप्राचार्य संतोष मतसागर, विभाग प्रमुख प्रा. प्रमोद गडपायले, प्रा. सोनाली गोरखा, प्रा. श्रीराम काळे, प्रा. सागर भोजने, प्रा. इक्रम पठाण, प्रा. महेंद्र राजपूत सर्व विषय शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व कौतुक केले. उत्कृष्ट निकालामुळे सर्वच स्तरातून विद्यार्थी व शिक्षक यांचेवर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# आ. राजेश पवार यांच्यावर करवाई करून प्रशासनाने कायद्याचा धाक दाखवून द्यावा

## शिवा संघटना संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** २६ जून रोजी धर्माबाद शहरात आमदार राजेश पवार यांनी जनता दरबार आयोजीत केला होता. या दिवशी शहरात मनसेच्या वतीने आमदार साहेब लोकसभा निवडणुकीतून काहीतरी बोध घ्या; हिंदूंनी तुम्हाला भरभरून मते दिली तरीही त्यांच्या स्मशान भूमी व इतर विकासाकडे आपल्याला का विसर पडतो! अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले. ही बाब मूळ वादाचे कारण बनली आणि त्यानंतर भाजपा तालुकाध्यक्ष विजय डांगे यांच्या फिर्यादीनुसार मनसेचे शहर अध्यक्ष सचिन रेडी व हणमंत कते या युवकाविरुध्द धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या नव युवकांवर गुन्हे दाखल करण्यापेक्षा बेनामी संपती साठवून ठेवलेल्या आ. राजेश पवार यांच्यावर करवाई करून प्रशासनाने कायद्याचा धाक दाखवून द्यावा अशी मागणी शिवा संघटना संस्थापक अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे यांनी यावेळी केली आहे हणमंत कते या युवकाचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही, किंवा या प्रकारात कसल्याही प्रकारचा सहभाग नसतानाही त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याने वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी या हा प्रकार हुकूम शहीचा असून त्वरित गुन्हे मागे घ्यावे अन्यथा ४ जुलै रोजी धर्माबाद बंद चे आवाहन केले त्या बंद ला विविध सामाजिक संघटना, समाजाचे प्रतिनिधि, हिंदुत्ववादी संघटनां आदी सह सुमारे ३६ पाठिंबा दिला.सर्व व्यापाऱ्यांनी आपापली प्रतिष्ठान कडकडीत बंद ठेवली होती. बसवआण्णा हिल्स येथून सदरील जनआक्रोश मोर्चाची सुरुवात झाली त्यानंतर मुख्य मार्गावरून हा मोर्चा पोलीस ठाण्यात पोहचला तिथे निवेदन देण्यात आले आणि शेवटी तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले. लोकशाहीत आदरयुक्त भाषेत बॅनर लाऊन आमदारांना आपल्या हक्काची जाणीव करून देणे, हे जर गुन्हा असेललातर सर्व धर्माबाद कारण हा गुन्हा मान्य आहे? गुन्हा दाखल करणे म्हणजे एका प्रकारे सत्तेचा दुरुपयोग करून आमदारांनी गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले आहेत हे गुन्हे एका आठवड्यात मागे नाही घेतल्यास पुढील मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

या मोर्चात मोठ्या संख्येने विविध संघटनाचे पदाधिकारी,सामाजिक कार्यकर्ते , व नागरिक सहभागी होते.होणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.सर्वसामान्य गोर गरीबांच्या मुलांवर गुन्हे दाखल करणाऱ्या आ.राजेश पवार यांच्या अनेक बेनामी संपतीची परिपूर्ण यादी माझ्याकडे आहे प्रशासनात हिंमत असेल तर त्यावर करवाई करून दाखवावी असे म्हणत पुढील मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

आज ज्या पदतीने धर्माबाद तालुक्यामध्ये गलिच्छ राजकारण चालू आहे, धर्माबाद तालुका निर्मिती झाल्या पासून कधीच झाले नाही .आमदार अनेक झाले पण जनतेच्या सर्व सामान्य नागरिकांना, विरोधकांना कधीच दुष्मन, विरोधक समजत नव्हते आज चे आमदार कमी टक्केवारी जास्त खाणारे आहेत .त्यांना धडा शिकवणे गरजेचे आहे .धर्माबाद तालुक्यातील जनतेने आमदार ला धडा लवकरच शिकवणार

**धर्माबाद समस्त मोर्चेकर**

ज्या सूडबुद्धीने आमदार राजेश पवार यांनी मनसे शहराध्यक्ष व हणमंत कत्ते, यांच्यावर कारवाही करून सुद्धा थांबले नाहीत, सर्व सामान्य नागरिकांची भामिका का मांडल्या म्हणून शहराध्यक्ष मनसेच्या सचिन रेड्डी त्यांच्या अधिकृत बारवर राज्य उत्पादन शुल्क यांना हाताशी धरून, पदाचे गैर वापर करत राजेश पवार यांच्या सांगण्या प्रमाणे धाड टाकण्यात आले .

माझ्या मनसेच्या शहराध्यक्ष यांचे बार अधिकृत असताना सुद्धा त्यांच्या बारवर तुमच्या सूडबुद्धीने राज्य उत्पादन शुल्क यांचे गैर वापर करत धाडी टाकता, पण भाजपचे शहराध्यक्ष आमदार राजेश पवार, यांचे कट्टर रमेश गोड यांचे सुद्धा बार व नायगाव येथे देशी दारूचे दुकान आहे, त्याच्यावर राज्य उत्पादन शुल्लकची कारवाई का करत नाहीत नायगावची, आडवी बाटली उभे करणाचे काम तुमी केल्या हे नायगावच्या महिलासह धर्माबाद तालुक्यातील महिलांना माहिती आहे .आरपीआय चे तुमी आमदार आहे हे विसरू नका,

**मनसे जिल्हा अध्यक्ष**



# पत्र



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**धुकाळलेल्या पहाटे रकमा आजी लवकर उठली. कशीतरी लडबडत अंगणात आली. बाहेर मांडलेल्या तीन दगडाच्या चुलीवर काळंभोर झालेलं डिचकं चढवलं. चुलीत लाकडे सारता सारता तोंडावर येणारा पदर नीटसा सावरला. आणि तिचं मन लेकरांच्या आठवात गेले. "मुंबईला कामानिमित्त राहत असलेलं पोर सून किती दिवस झालं गावाकडं आलीच नाहीत. नातवंडाचं तोंड बघावं, गुबऱ्या गालावरून खडबडीत झालेला हात फिरवावसा वाटतोय पण म्हातारीच्या फाटक्या पदरातही नेटकी माया हाय याचं मोल त्यास्नी कवा कळल तवा कळलं !.**

तोवर तिच्या कानावर आवाज पडताच, विचारांची तद्री भंग झाली. अंगाने भरलेली, सावळ्या रंगाची, भलंमोठं कुंकू कपाळावर ल्यालेली शेंवता काकू झपाझप पाऊलं टाकत तिच्या घराकडेच येताना दिसली.जवळ येताच ती म्हणाली,
"रकमा आज मुलीची सासरी पाठवणी हाय. दूरडी बांधायची हाय बघ . तवा काय हवं नको ते सांगाया लवकर ये बरं. अन दुसरं स्वयंपाक करत बसू नगस आमच्याच घरी जेवायला ये. बरं येईन मी परं थोडा चहा तरी घेऊन जा की,लगेच टाकते बघ पेटलेल्या चुलीवर. "नको गं उशीर झालाय.पाहुणं येतील एवढ्यात " म्हणत ती पाठमोरी फिरली. अन तिने लगबगीने रस्ता धरला. रकमा आजी गावाची आजी होती. नडल्या आडल्याना मदत करणारी, दुसऱ्याच्या सुखात आपलं सुख पाहणारी अन दुःखात द्यायला जवळ काही नसलं तरी अनुभवाच्या गाठोडयातलं धीराचं शब्द देत उभारी देणारी. शरीर थकलं तरी ती थकली नव्हती. स्वतःच्या पोटाची खळगी भरायला या वयातही ती चार घरची कामं करायची. त्याना तोंडाने कामाचं मोल कधीच मागायची नाही. ते देतील त्यात समाधानी असायची.दिवसभराची कामे उरकून संध्याकाळी मंदिराच्या बाजूला बांधलेल्या कट्ट्यावर टेकलेली दिसायची. तिच्या वयाच्या सोबतीही हळूहळू गोळा व्हायच्या .अनेक विषयावर गप्पा जोरात रंगायच्या .पांढरे झालेले केस, सुरकुतलेले हात,जुने, नवे अनुभव ओकत असायचे. दुःख, चिंता विसरून त्या एकमेकीत विरघगुळून जायच्या. वाऱ्याच्या मंद झोताबरोबर गाणी गुणगुणताना दिसायच्या. तिलाही तेवढंच बरं वाटायचं.दिवसभराचा थकवा कुठल्या कुठे पळून जायचा.सुर्य मावळतीला जाताच एकेकजणी हळूहळू आप आपल्या घराकडे निघायच्या. रकमा आजी नेहमीप्रमाणे एका साहेबांच्या घरी काम करायला गेली होती. रविवार सुट्टीचा दिवस असल्याने.ते कोणतातरी ग्रंथ वाचत बसल्याचे तिला दिसले. त्यांचे एकाग्र चित्ताने वाचने अन डोळे मिटून ध्यानाला बसणे याचे राहून राहून तिला नवल वाटत होते .ती त्यांच्या ध्यानस्थ, तेजस्वी चेहऱ्याकडे एकटक पाहत होती. त्यांची साधना झाल्यावर तिने न राहवून विचारले.
"साहेब मगापासून तुम्ही काय वाचीत होता. आणि तसं ध्यान लावून कशापायी बसायचं."
साहेबानी एक कटाक्ष आजीच्या चेहऱ्यावर टाकला. भुरभूणारे पांढरे केस बाजूला सारत, खोच लेला पदर अंगाला लपेटत,खोल गेलेले पण बोलके डोळे बरंच काही सांगून जात होते.तिला मनापासून जाणून घ्यायचे होते हे त्यांना उमजले.
साहेब आजीला म्हणाले, मी ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचतो आहे आणि डोळे मिटून ध्यान केल्याने मन प्रसन्न होते. दुःख, काळजी, चिंता दूर होतात. "अन ज्ञानेश्वरी वाचल्याने काय होतंय?." आजीने सहज प्रश्न केला. ते थोडे स्मितहास्य करत म्हणाले.
"जीवन कसं जगावं. उगाच कोणाकडून जास्त अपेक्षा करू नयेत. पदरात मिळालेले परमेश्वरी दान आहे त्यात समाधान मानावे. खूप काही सार या ग्रंथात समावले आहे. नुसते शब्दांनी सांगून ते संपणार नाही.प्रत्येकांन मानव जन्माला येऊन एखादा तरी ज्ञानेश्वरी वाचावी."
साहेबांचे हे शब्द कानावर पडताच आजीच्या मनात एक विचार चमकून गेला.आणि ती म्हणाली,
"मलाही ज्ञानेश्वरी वाचायची हाय. पण मी अनपढ बाय कशी वाचू."? आजीची प्रतिक्रिया पाहण्यासाठी ते सहजच म्हणाले, "तुम्हाला आधी वाचायला यायला हवे.त्यासाठी तुम्हाला शिकावे लागेल."
रकमा आजी म्हणाल्या, "आता सत्तरीला गाठ आली हाय. आता या वयात शिकणं होईल का ओ ? अन मला म्हातारीला कोण शिकवल"?
तेंव्हा साहेब तिला म्हणाले, "रोज सकाळी तुम्ही लवकर आमच्या घरी आलात तर मी तुम्हाला शिकवेन. त्यांच्या या शब्दाने आजीला आनंद झाला पण एवढे मोठे साहेब आपल्याला शिकवणार त्यामुळे तिला थोडे अवघडल्या सारखेही झाले.पण सुरुकुतल्या चेहऱ्यावर एक हास्याची लहर उमटली. आजीचे शिकणे आणि शिकवणे सुरु झाले. भल्या पहाटे उठून ती घरातली कामे उरकून साहेबांकडे जाऊ लागली. या वयातही तिला शिकण्याची उमेद



स्वस्थ बसून देत नव्हती . ज्ञानेश्वरी ग्रंथ स्वतः वाचण्याचे जणू तिला वेदच लागले होते.तिला शिकण्यासाठी लागणारे साहित्य साहेबानी हौसेने आणले होते. त्यांनाही आजी या वयात शिकत आहेत याचे भारी कौतुक वाटत होते.एकेक आकार, अक्षरे गिरवणे सुरु झाले. साहेबांची पत्नी हे सारं कौतुकाने पाहत असायची. सुरुवात थोडी कठीण गेली पण तिने जिद्द सोडली नाही. घरी आल्यावर मातीवर अक्षरे अंक गिरवत सराव करू लागली. कधी खडे तर कधी चिंचोके मोजू लागली.रात्री आकाशीच्या चांदण्याही तिच्याशी बोलू लागल्या. त्या टपोरे चांदण्यात ती एकटीच गुणगुणत बसायची. एक दोन महिन्यातच आजीला साधे सोपे शब्द वाचता येऊ लागले. ती काम आवरून झाले की सतत शब्दवाचनात रमलेली दिसायची. जुना पेपरचा तुकडाही ती आलटून पालटून पाहायची आणि साहेबांना म्हणायची, "जमतंय का ओ साहेब या म्हातारीला. ते लगेच आजीला पोत्साहित करीत म्हणायचे, "खूप छान जमतंय पण, उदया आपल्याला पुढचा धडा गिरवायचा आहे बरं. "व्हय गिरवीन की, येणाऱ्या श्रावण महिन्यात मी ग्रंथ वाचायला बसीन असा विचार करत्या. हो तुम्ही शिकण्यासाठी जादा वेळ दिलात तर ते शक्य होईल. लगेच ती मानेनच हो म्हणायचीआणि वाचनाचा सराव करत बसायची. रोज साहेबांकडून शिकता शिकता नकळत दोघांमध्ये माय लेकरांच नातं निर्माण झालं होतं. त्यांच्या मुलांची ती लाडकी आजी झाली होती. तिलाही मायेचा पाझर फुटायचा. त्या लेकरात ती ही लहान होऊन जायची. घरात केलेला गोडाधोडाचा घास त्यांच्यासाठी बाजूला काढून ठेवायची. आणि आजी एखादा दिवस गेली नाही तरी साहेब आणि त्यांच्या पत्नी तिची काळजी करत असायचे. "आज आजी अजून कशी आली नाही ओ? आजारी पडली की कोणाच्या कार्यक्रमाला गेली काय माहित. न कळतं ती येण्याच्या वाटेवर डोळे लावून बसायची. आणि आजीला वाटायचे. "पुढं कामाचा डोंगूर असतानाही लेकरू मला शिकवत असतं. कुठं उपकार फिटायच याचं. एक दिवस साहेबांना वरच्या साहेबांचे बोलवणे झाले. त्यामुळे त्यांना तातडीने जिल्हाच्या ठिकाणी जावे लागले. आजीला का कुणास ठाऊक पण आज चुकल्या चुकल्यासारखे वाटत होते. दुसऱ्या दिवशी ती नेहमीप्रमाणे त्यांच्या घरी गेली असताना तिला साहेब थोडेशे शांत असल्यासारखे दिसले. त्यांनी नेहमीप्रमाणे आजीला धडा शिकवला आणि ते नाराजीच्या स्वरात म्हणाले,
"आजी माझी दुसऱ्या तालुक्याच्या ठिकाणी बदली झाली आहे. मला तातडीने तिकडे हजर व्हावे लागणार आहे. पुढचा धडा इथंच थांबवावा लागतोय. मी नसलो तरी तुम्ही सराव करत रहा. तुम्हाला ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचणे नक्कीच जमेल."
साहेबांचे हे शब्द तिच्या कानावर पडताच डोळ्यात टचकन पाणी उभा राहिले.टेबलावर ठेवलेली पुस्तके धूसर दिसू लागली. तिने मातीत गिरवलेली अक्षरे तिच्याच भोवती नाचत असल्याचा भास तिला झाला. तिच्या भोवती खेळणारी लेकरं दुरावणार याचं तिला खूप वाईट वाटलं. पण वास्तव स्वीकारावेच लागणार होते.
साहेबांना निरोप देण्यासाठी सगळा गाव गोळा झाला होता. त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांनी प्रत्येकाच्या हृदयात स्थान निर्माण केले होते.आजीने साहेबांना देण्यासाठी लाडुचा डबा आणला होता. त्याचा हातात तो डबा देऊन तिने आईच्या मायेने गालावरून, पाठीवरून हात फिरवला.
"सुखात राहू दे माझं लेकरू असा हृदयापासून आशीर्वाद दिला. आजीला सोडून जाणे त्यांच्याही कुटुंबाच्या जिव्हारी आले होते. लेकरं आजीच्या पदराला ओढत तुम्हीही आमच्यासोबत चला म्हणून हट्ट करत होती. शेवटी गाडी आपल्या प्रवासाला लागली.धूसर झालेल्या डोळ्यातील आसवे पुसत ती थरथरथत्या हातांनी हात उंचावत निरोप देत होती. गाडी दिसेपर्यंत ती तिथेच उभी होती.
आज तिला काहीतरी हरवल्यासारखे वाटत होते. पोटाशी पुस्तकांना कवटाळून ती त्याच जागी थोडावेळ बसून राहिली.स्वतःच मनाची समजून घालत ती कामाच्या ठिकाणी पोहचली. साहेब व त्यांचे कुटूंबीय नवीन नोकरीच्या जागी हळूहळू रूळले .रोज नवीन कामाचे आव्हान पेलत त्यांनी त्या ठिकाणीही खूप बदल घडवून आणला होता. दिवसेंदिवस कामाचा व्याप वाढत होता.अनेक ठिकाणी दौरे, भेटीगाठी, सामाजिक कामात वाहून घेतल्या मुळे त्यांना स्वतःसाठी, वेळ देणेही फारसे जमत नव्हते. एक दिवस असेच ते कामात व्यस्त असताना कार्यालयातील शिपाई एक साधे आंतरदेशीय कार्ड घेऊन आला. आणि म्हणाला, "साहेब हे पत्र घ्या, कोणीतरी तुमच्या नावावर पाठवले आहे." त्यांना आश्चर्य वाटले कोणी बरं पत्र पाठवले असेल. साहेबांनी ते पत्र हातात घेतले. तर त्यात दोनच ओळी मोडक्या तोडक्या अक्षरात लिहिल्या होत्या. "ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचून झालाय. साहेब प्रसादाला यावं ही विनंती." त्या दोन ओळी वाचताच साहेबांचे अंतकरण भरून आले.आपसूक डोळ्याच्या कडातून आनंदाश्रू ओघळले.ते नुसते पत्र नसून आजीचे स्वप्न व साहेबांचे अंतकरण जोडणारा घट्ट धागा होता. चिरंतन स्मरणात राहणारा. अनेकांना धडा देणारा.




# दत्तघाट परिसरातील भिंतीवर विठ्ठलाचे रूप

आधुनिक केसरी

**श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आगमन सातारा जिल्ह्यात दिनांक ६ जुलै रोजी होत आहे.या पार्श्वभूमीवर जय्यत तयारी सुरू आहे. जिल्ह्यात प्रवेश करतानाच पाडेगावच्या हद्दीत भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात येते.यंदा याच परिसरात दत्त घाट परिसरातील भिंतीवर विठ्ठलाचे रूप साकारण्यात आलेले आहे. हे रूप लक्ष वेधू लागलेले आहे. छायाचित्र : सुशिल गायकवाड**

# ज.मो.अभ्यंकर यांच्या विजयाचा लोह्यात शिक्षक सेनेच्या वतीने जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मुंबई शिक्षक मतदार संघातुन शिवसेना उबाठा प्रणित शिक्षक सेनेचे उमेदवार ज.मो.अभ्यंकर यांचा दणदणीत विजय झाल्याबद्दल लोहा येथे शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक सेनेच्या वतीने पेढे वाटून गुलाल उधळून जल्लोष साजरा करण्यात आला.
यावेळी शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण,जेष्ठ शिक्षक नेते बी.वाय.चव्हाण, लोहा तालुकाध्यक्ष संभाजी पवार, लहू पंदलवाड, आर.जी. वाघमारे,जोशी, वाय.पी.कुलकर्णी, दिपक भुरे, मदन नायके, शिवराज सोनवळे, गंगाधर राऊत, उतम देवकते, जोशी, गंगाधर राऊत,नागेश स्वामी, बंडप्पा स्वामी, ज्ञानोबा होळगे, तिडके, डी.व्ही. केंद्रे,ईरबा नागरगोजे, संभाजी केंद्रे, चंद्रकांत गौड,वामन पवार, भुजंग वाघमारे, काचमोडे, जाधव सह शिक्षक सेनेचे तालुका पदाधिकारी उपस्थित होते. विठूभाऊ चव्हाण शिवसेना उबाठा प्रणित शिक्षक सेनेचे मुंबई शिक्षक मतदार संघाचे उमेदवार ज.मो. अभ्यंकर यांचा विजय म्हणजे सत्याचा विजय आहे. सर्व सामान्यांची जाण असणारे चारित्र्य संपन्न आणि शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी संपूर्ण शैक्षणिक क्रांतीसाठी शिक्षकांच्या विश्वासाला पात्र असलेले शिक्षक सेनेचे ज.मो.अभ्यकर यांच्यासारखा व्यक्ती राज्य विधिमंडळाच्या संभागृहात गेले आहेत त्यांच्यामुळे आम्हाला आनंद होत आहे अशी प्रतिक्रिया शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठूभाऊ चव्हाण यांनी दिली.



# डिव्हायडर फोडून कंटेनर ट्रकवर आदळला

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** राज्यात रस्ते विस्तारीकरणाचे काम गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात झाले असून रस्त्यांचे जाळे वाढले आहे. साहजिक वाहनांची संख्याही दरवर्षी वाढत असून अपघाताचे प्रमाणही वाढल्याचं आकडेवारीवरुन दिसून येत आहे.
राज्य किंवा राष्ट्रीय महामार्गावर जड वाहनांच्या अपघाताचे मूळ कारण हे वाहनाचा वेग आणि ओव्हरटेक करणे हेच असल्याचेही समोर आले आहे. बेळगाव जिल्ह्यात पुणे-बंगळुरू महामार्गावर नुकतेच एका कंटनेर वाहनाचा भीषण आणि विचित्र अपघात झाला आहे. या भीषण दुर्घटनेत कंटेनरचालक आणि ट्रकमधील ड्रायव्हर यांना गंभीर दुखापत झाली असून दोघांचेही पाय तुटल्याची प्राथमिक माहिती आहे.
पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने डिव्हायडरवरून दुसऱ्या बाजूला कंटेनर जाऊन भीषण अपघात झाला. डिव्हायडरच्या बाजुला असलेल्या ट्रकला कंटेनरची धडक बसून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर हलगा गावाजवळ हा विचित्र अपघात घडला. कंटेनरच्या धडकेने ट्रकच्या केबिनचा चेंदामेंदा झाला असून दोन्ही वाहनांचे चालक गंभीर जखमी झाले आहेत. अपघात झाल्यावर दोन्ही वाहनांचे चालक जखमी अवस्थेत वाहनात अडकून पडले होते. यावेळी, त्यांना बाहेर काढण्यासाठी स्थानिकांनी पोलिसांना मदत केली. रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकमधे दोन जण प्रवासी होते, ते देखील किरकोळ जखमी झाले आहेत. या भीषण अपघातात दोन्ही चालकांचे पाय तुटल्याची माहिती आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस व प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत स्थानिकांच्या मदतीने दोन्ही वाहन चालकांना गाडीतून बाहेर काढले. त्यानंतर, उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. अपघातामुळे राष्ट्रीय महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. हिरे बागेवाडी पोलीस स्थानकात या विचित्र अपघाताची नोंद झाली आहे.

# महिला अधिकाऱ्याचा कर्मचाऱ्याकडून विनयभंग

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** ठाण्यातील कासारवडवली भागातील एका खासगी कंपनीत एका ४२ वर्षाच्या महिला अधिकाऱ्याचा याच कंपनीतील एका ३२ वर्षाच्या कर्मचाऱ्याने विनयभंग केला आहे. ही महिला डोंबिवलीतील पलावा गृहसंकुलात राहत असल्याने कासारवडवली पोलिसांनी हा गुन्हा मानपाडा पोलीस ठाण्यात अधिक चौकशीसाठी वर्ग केला आहे. याप्रकरणी तक्रारदार महिला अधिकाऱ्याने काम करत असलेल्या कंपनीच्या वरिष्ठांना यासंदर्भात लेखी तक्रार केली होती. या तक्रार अर्जाची चौकशी केल्यानंतर कंपनी प्रशासनाने या पीडित महिला अधिकाऱ्याला पोलीस ठाण्यात तक्रार करण्याची सूचना केली. प्रितेश जगताप (३४) असे कर्मचाऱ्याचे नाव आहे. या सूचनेप्रमाणे महिलेने कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार केली. दुपारच्या वेळेत पीडित महिला कंपनीच्या भोजनगृहात भोजन करत होत्या. भोजन झाल्यानंतर त्या भोजनगृहात एकट्याच मोबाईलवरील संदेश वाचत बसल्या होत्या. यावेळी भोजनगृहात एक कर्मचारी वगळता कोणीही नव्हते. या संधीचा गैरफायदा घेत कर्मचाऱ्याने महिला अधिकाऱ्याच्या जवळ जाऊन लगट करण्याचा प्रयत्न केला.



# कंधार येथे विधानसभा अनुषंगाने शिवसेनेची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** येथील विश्रामगृहात ३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक शासकीय विश्रामगृह कंधार येथे शिवसेना तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव यांनी बैठक आयोजित केली होती.

या बैठकीस माजी आमदार लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, सभापती सतीश उमरेकर, शहर प्रमुख अतुल पापीनवार, माजी सभापती तालुका संघटक पंडित देवकांबळे, पं.स. सदस्य तालुका समन्वयक उत्तम चव्हाण, माजी सभापती माणिक चोपवाड, माझीतालुकाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख बाबाराव पाटील शिंदे यांच्यासह ज्येष्ठ व युवा सैनिक उपस्थित होते.

सदर बैठकीत येणाऱ्या विधानसभा निवडणुकी संदर्भात संगोपान चर्चा होऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी मतदार संघांमध्ये निष्ठावंत व योग्य उमेदवार घ्यावा याकरिता विधानसभा लोहा-कंधार मतदारसंघातील शिवसैनिक लवकरच माननीय पक्षप्रमुख भेट घेण्याचे ठरले.आणि मनार प्रकल्प बारूळ येथून उदगीर व जळकोट तालुक्यातील २२० गावाला जाणारे पाणी योजना ही कंधार तालुक्यात वाळवंट निर्माण करणार असल्यामुळे येणाऱ्या काळात शिवसेना जन आंदोलन करण्याचे ठरले तसेच आज तारखेत कोणताही उमेदवार निश्चित नसून उद्धवजी ठाकरे जो उमेदवार देतील त्यांना निवडून आणण्यासाठी जुन्या व नवीन शिवसैनिकांनी कामाला लागावे असे माजी आमदार म्हणाले, या कार्यक्रमांचे प्रस्ताविक परमेश्वर जाधव यांनी केले तर सूत्रसंचलन उत्तम चव्हाण यांनी केले. आभार पंडित देवकांबळे यांनी मानले. दादाराव पाटील शिंदे उपतालुकाप्रमुख कंधार, शिवाजी पाटील कदम किसान सेना तालुकाप्रमुख कंधार, विश्वनाथ पवार उपतालुकाप्रमुख कंधार, संभाजी पाटील कदम किसान सेना उपतालुकाप्रमुख कंधार, राहुल पाटील शिंदे युवा सेना उपतालुकाप्रमुख कंधार, रोहिदास शिराढोणे विभाग प्रमुख कवठा, संतोष पाटील घोरबांड विभागप्रमुख शिराढोण, आत्माराम पाटील लाडेकर विभाग प्रमुख बहादरपुरा, राजीव पाटील डफडे विभागप्रमुख फुलवळ, जिएम पवळे विभागप्रमुख कुरुळा, रमाकांत देवने गणप्रमुख शिराढोण,मोहन हराळे गणप्रमुख कवठा, लक्ष्मण कटवाड गणप्रमुख हळदा, भगवान कुंजरवाड गणप्रमुख पेटवडज यांची निवड करण्यात आली. यावेळी निरंजन वाघमारे, शरद बिजलगावे, संतोष जोतकर, ओम बंडेवाड, गजानन सुकणे, संदीप गायकवाड, विजय मोरे, बालाजी डांगे, सुधाकर पवार, शंकरराव चिवळे, बालाजी बसवदे, अलीभाई शेख, संपतराव पाटील बामनीकर, व्यंकटराव मोरे, वसंत निलावाड, बालाप्रसाद मानसपुरे, विश्वनाथ बामनवाड, रामराव मोरे, भीमराव शिंदे, बालाजी गाडेकर, बालाजी जाधव, रमेश डोळेवार,बालाजी कदम, दिगंबर शिंदे, बालाजी मोरे, लक्ष्मण गायकवाड, जगन्नाथ जाधव, महेंद्र तेलंग यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

# तालुक्यात 'आर्द्रा' नक्षत्रात तुरळक पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** यंदा पावसाळा वेळेवर सात जुनला सुरु झाला तर मृग नक्षत्राच्या पावसाने जोरदार आगमन केले. सातआठ दिवस जोरदार पाऊसही झाला मात्र शेवटच्या तीनचार दिवस शेवटच्या टप्प्यात हुलकावणी दिली तर आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने आगमान केले त्यानेही सुरुवातीला जोरदार आगमन करुन फटकेबाजी केली मात्र तद्नंतर मात्र तुरळक पाऊस झाला.व शेवटी ते कोरडा गेला मात्र दि.पाच पुनर्वसु नक्षत्र लागत असुण शेतकऱ्यांची त्याच्यावर भिस्त आहे.

रोहिण्या नक्षत्रापासुन अवकाळी पावसाने सुरूवात केल्याने शेतकऱ्यांला पेराची घाई झाली काही शेतकऱ्यांनी कोरड्यातच पेरा लागवड केली तर काहींनी सात जुन मृग नक्षत्राचा पाऊस होताच मृगचा मुहूर्त साधून पेरा लागवड केली.त्यात पावसाने ही साथ दिली.मृग व आर्द्रा नक्षत्राचे कमीअधिक पाऊस झाल्याने खरिप पिके हिरवीगार टवटवीत फडफडु लागली आहे.तर नक्षत्राच्या शेवटच्या टप्प्यात दोन्ही नक्षत्राने हुलकावणी दिली. कापुस मका सोयाबीन भुईमूग तुर ज्वारी बाजरी मुग उडीद सर्वच खरिप पिके जबरदस्त वाढ करत आहे.मात्र त्यांना मोठ्या पावसाची गरज आहे. सद्या शेतकऱ्यांकडून ढावरा मारणे,कोळपणी, वखर मारणे,निंदणी खुरपणी पिक अंतर्गत मशागत कामे शेतकऱ्यांकडून सुरु आहे.मोठ्या पावसाची गरज असुण पाच जुलैपासून पुनर्वसु नक्षत्र लागत असल्याने शेतकऱ्यांची पुनर्वसु वर भिस्त आहे.





# स्पर्धेपरिक्षेतून वैष्णवीची महाविद्यालयात निवड; शिक्षकवृंद विद्यार्थ्यांकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हापरिषद शाळेची विद्यार्थिनी वैष्णवी रावसाहेब नलावडे हिची स्पर्धा परीक्षातून इयत्ता अकरावी बारावी साठी जवाहर नवोदय विद्यालय परतुर जालना निवड करण्यात आली. तब्बल तीन विद्यार्थ्यांर्ची निवड स्पर्धा परीक्षेतून झाली आहे. जिल्हा परिषद शाळा तथा क्रियेटीव्ह कोचिंग क्लासेस चे तिन्ही विद्यार्थी असुण संचालक व शिक्षक पोपट काटकर यांनी निवडीबद्दल पुष्पकुछ देवून सत्कार केला यावेळी शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्येष्ठ अभिनेत्री स्मृती विश्वास यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ अभिनेत्री स्मृती विश्वास यांचं निधन झालं आहे. अभिनेत्री स्मृती विश्वास नारंग यांनी अभिनेते राज कपूर आणि देवानंद यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम केले आहे. स्मृती विश्वास यांनी वयाच्या 100 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. स्मृती विश्वास यांचं महाराष्ट्रातील नाशिकमध्ये त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. बुधवारी 3 जुलै रोजी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. फिल्म हेरिटेज फाऊंडेशनने सोशल मीडियावर त्यांचा फोटो पोस्ट करून अभिनेत्रीच्या निधनाची माहिती दिली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री स्मृती बिस्वास यांनी हिंदी, मराठी आणि बंगाली चित्रपटांमध्ये काम केलं. फिल्म हेरिटेज फाऊंडेशनने या अभिनेत्रीचा फोटो सोशल मीडियावर शेअर करून ही दुःखद बातमी दिली असून गुरुवारी ख्रिश्चन पद्धतीने तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अभिनेत्री स्मृती विश्वास यांनी 1930 च्या दशकात फिल्मी कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी नेक दिल', 'अपराजिता' आणि 'मॉडर्न गर्ल' या हिट चित्रपटामध्येही काम केले. त्यांनी अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले आणि महत्त्वपूर्ण योगदान दिले.



# ओबीसींनी फक्त मतं द्यायला जन्म घेतलाय का ?

## ओबीसी आंदोलनकर्ते प्रा.लक्ष्मण हाकेंचा सवाल : लोणंद येथे ओबीसी बांधवांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ओबीसी आरक्षणाच्या अनुषंगाने अंतरवली सराटीच्या वेशीवर वडीगोद्री येथे ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी आंदोलन केले.राज्यभर या आंदोलनाचे पडसाद पाहायला मिळाले.राज्य सरकारला ही प्रा.लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी लागली.सरकारसोबतच्या सकारात्मक चर्चेनंतर तात्पुरते आंदोलन स्थगित करण्यात आले. तदनंतर ओबीसी बांधवांशी संवाद करण्यासाठी प्रा. लक्ष्मण हाके यांच्याकडून महाराष्ट्र भर दौरे सुरू करण्यात आलेले आहेत.खंडाळा तालुक्यातील नायगाव,लोणंद या भागात प्रा.लक्ष्मण हाके यांनी सदिच्छा भेट घेत ओबीसी बांधवांशी संवाद साधला. यावेळी बैठकीतून ओबीसी आरक्षण तसेच विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.प्रा.लक्ष्मण हाके यांनी पत्रकारांशी संवाद साधताना परखडपणे भूमिका मांडल्या.सत्तेमधून पैसा आणि पैशामधून सत्ता,मॅन, मनी, मसलच्या च्या जोरावरती या महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये निवडुन जाणाऱ्या लोकांना आमच्या ओबीसीच्या हक्क अधिकारांचे काही आहे की नाही? आमच्या प्रश्नावर बोलणार आहेत की नाहीत? आम्हांला त्यांनी गृहित धरलंय का? ओबीसींनी फक्त मतं द्यायला जन्म घेतलाय का? असा सवाल प्रा.लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला.

यावेळी संजय जाधव,गणेश केसकर,हर्षवर्धन महामनवर,गणेश धायगुडे,नवनाथ धायगुडे, महादेव कुलाळ, आप्पा ठोंबरे,नितीन सुळ,गणेश कुलाळ, विकास धायगुडे,नारायण गोवेकर, अजित गोवेकर, गिरिश बनकर, प्रशांत ढावरे,अजित जाधव, सुनील रासकर,सुनील डोंबाळे,वामन कारंडे, दिनकर कोळेकर,भरत वाघमोडे,विकास सोनवलकर,तानाजी कोळेकर,हरीश धायगुडे आदींसह इतर उपस्थित होते.



प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की,मराठवाड्यामध्ये उपोषण संपल्यानंतर जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता.पश्चिम महाराष्ट्रातील आपल्या ऊर्जा स्थळांना भेटी द्यायच्या,लोकांशी संवाद साधायचा, ओबीसी,व्ही जे एन टी,एस बी सी चे आरक्षण वाचवायचं,सामाजिक न्याय हक्काचं आरक्षण वाचवायाचं,हे आरक्षण वाचवत असताना पंचायत राज मधील आरक्षण, बजेटरी तरतुद,जात निहाय जनगणना आणि राजकिय प्रतिनिधित्व या सर्व गोष्टीवर ओबीसीचं एक जनआंदोलन या महाराष्ट्रामध्ये उभं करावं.या भावनेमधून आम्ही महाराष्ट्राच्या प्रत्येक भागामध्ये फिरत आहोत.परत मराठवाड्या मध्ये जात आहोत.या महाराष्ट्रामधल्या गांव गाड्यामधला जो ओबीसी आहे.भटक्या विमुक्त जमाती आहे.या लोकांना त्यांचं आरक्षण धोक्यात आलेलं आहे.एका बाजूला महाराष्ट्र शासन म्हणतं की,आम्ही ओबीसीच्या आरक्षणाला कसला ही धक्का लागू देणार नाही.त्याचवेळेला जरांगे पाटील मराठा समाजाचे आंदोलक म्हणतात की,आम्ही ओबीसीं आरक्षणात ८० टक्के प्रवेश केलेला आहे. सग्या सोयऱ्याच्या आदेशाद्वारे आम्ही उरलेले २० टक्के सुद्धा या आरक्षणामध्ये घुसणार आहोत.एका बाजूला शासन तरी खरं बोलतय नाहीतर जरांगे पाटील तरी खरं बोलतायत,

दोघांपैकी खरं कोण बोलतय आणि खोटं कोण बोलतंय ही जी संभ्रमावस्था आमच्या ओबीसी भटक्या विमुक्तांच्या मनामध्ये आहे.असे सुद्धा प्रा. लक्ष्मण हाके यांनी नमूद केले.

पुढे प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की,आमचं आरक्षण गेलंय की काय?आमचं आरक्षण डावलं जातंय की काय? पंचायत राजच्या निवडणूका गेल्या अनेक वर्षांपासून होत नाहीत.अशा एक ना अनेक समस्या या ओबीसींच्या मनामध्ये आहेत.लोकसभा निवडणूक झाली.त्या लोकसभा निवडणुकीमध्ये ओबीसींचं नेतृत्व ठरवून त्यांचा पराभव केला गेला आहे.ही एक प्रचंड नैराश्याची भावना ओबीसी बांधवांच्या मनामध्ये आहे.त्यांच्या मनामध्ये विश्वास निर्माण करावा.आपल्या हक्क अधिकाराविषयी लढायला प्रवृत्त करावं.म्हणून आम्ही अंतरवली सराटीच्या वेशीवरच वडीगोद्री गावामध्ये दहा दिवसाचं उपोषण केलं.या महाराष्ट्र शासनाला आम्ही जागं केलं.आमचे अर्धे प्रश्न त्यांनी मनावर घेतले. अजून अर्धे प्रश्न आमचे सोडवायचे आहेत.

परंतु आमच्या ओबीसीचे हक्क,अधिकार, वेदना,समतेचं तत्व,संविधानाचं तत्व,संविधानाचं सामाजिक न्यायाचं तत्व,अठरापगड जातींच्या मनामध्ये एक विनविन परिस्थिती,या फुले शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्रामध्ये निर्माण करायची, त्यांचं प्रतिनिधित्व कोणत्या क्षेत्रामध्ये आहे.त्यांचं शिक्षणामध्ये,नोकऱ्या मध्ये,विधानसभे मध्ये की लोकसभेमध्ये प्रतिनिधित्व आहे? ह्या भावना सुध्दा त्यांनी व्यक्त केल्या.

झुंडशाहीवर बोट ठेवताना प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले की,कारखानदारी मध्ये ओबीसी कुठे आहे?इथल्या उपजाऊ जमिनीमध्ये ओबीसीं कुठं आहे?ओबीसींची ही अवस्था असेल तर ओबीसीं फॉरवर्ड कसा झाला? आमचा मराठा बांधव मागास कसा झाला? या प्रश्नांची उत्तरं ना शासनाकडे आहेत, ना मराठा समाजाच्या आंदोलकांकडे आहेत.

झुंडशाहीच्या जोरावर ओबीसीं मध्ये घुसायचं, महाराष्ट्रात राळ उठवून द्यायची आणि ओबीसीच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करुन द्यायचा हे जे वातावरण या महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेलं आहे. त्यामधून माणसांच्या मनामध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्रामध्ये दौरा करत आहोत.असे सुद्धा त्यांनी आवर्जुन सांगितले.

# मोक्षप्राप्तीसाठी पंढरपूरला जाण्याचा संतांनी केलेला उपदेश कल्याणकारी

## ह.भ.प. चंद्रकांत महाराज साकरीकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** आपल्या भारतात अनेक तिर्थक्षेत्रे असून आपली महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी आहे. संतांनी आपल्याला मोक्षप्राप्तीसाठी पंढरपूर तिर्थक्षेत्री जाण्याचा उपदेश केलेला आहे. हा उपदेश मनुष्य जन्माचे कल्याण करणारा आहे. त्यामुळे विठूरायाचे दर्शन करण्यासाठी आपण पंढरपूरला जायलाच हवे, असे प्रतिपादन ह.भ.प. चंद्रकांत महाराज साकरीकर यांनी केले.

शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिर संस्थानात श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कीर्तन सेवेत ते बोलत होते. पंढरीशी जा रे आल्यानो संसारा या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर चिंतन करताना ते म्हणाले की, संतांचे आपल्यावर प्रचंड उपकार आहेत. आपल्या जीवनाचे कल्याण व्हावे यासाठी त्यांनी आपल्याला उपदेश केलेला आहे. मनुष्य जन्माला येण्याचे सार्थक म्हणजे मोक्षप्राप्ती होय. ही मोक्षप्राप्ती करून घेण्यासाठी देवाचे नामस्मरण व कीर्तन करणे आवश्यक आहे. आपल्या महाराष्ट्राचे कुलदैवत पंढरपूर येथील श्रीविठूरायाच्या दर्शनाने किंबहुना पंढरपूर येथील मंदिराचा फक्त कळस पाहिल्याने मोक्ष मिळतो. त्यामुळे प्रत्येकाने पंढरपूरला जायलाच हवे. कारण पंढरीचा विठूराया हा प्रत्येक भाविकाची आतुरतेने वाट पाहत उभा आहे. तो आपल्या भक्तांना भेटण्यासाठी उतावीळ झाला आहे. त्यामुळे आपणही लाडक्या विठूरायाला भेटण्यासाठी व त्याचे दर्शन घेण्यासाठी वर्षातून किमान एकदा पंढरपूर जायलाच हवे. संतांनी देखील पंढरपूर क्षेत्राचे महत्त्व वर्णन केलेले आहे. तसेच संत निवृत्तीनाथ महाराज हे संत ज्ञानेश्वर महाराजांचे मोठे बंधू व गुरू होते. त्यांनी केलेल्या गुरूपदेशामुळे ज्ञानाची गंगा आपल्यापर्यंत येऊन पोहोचली. त्यामुळे संत निवृत्तीनाथांचे आपल्यावर प्रचंड उपकार असल्याचेही हभप चंद्रकांत महाराज साकरीकर यांनी आपल्या कीर्तनात सांगितले. कीर्तनाच्या समारोपानंतर चंद्रकांत महाराज यांनी संत गजानन महाराज यांचे दर्शन घेतले. मंदिरातर्फे त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यांच्यासोबत भुसावळ येथून मुरलीधर लोखंडे, सुरेंद्रसिंग पाटील, डॉ. जगदीश पाटील, सचिन माळी उपस्थित होते.



श्रीसंत गजानन महाराज मंदिर संस्थानची थोर परंपरा आहे. वारकरी संप्रदायात त्यांचे खूप मोठे योगदान आहे. वर्षभरात प्रासंगिक वेळेला अनेक कीर्तनकारांची कीर्तन मंदिरात होत असतात. यावेळी संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्रींच्या दरबारात आयोजित किर्तन सेवेचा योग वाट्याला आल्याचे भाग्य लाभले असल्याचे हभप चंद्रकांत महाराज साकरीकर यांनी सांगितले.

# प्रवाशाकडून वाहकास शिवीगाळ, थापड-बुक्क्यांनी मारहाण!

## कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** तालुक्यातील उमरज कडून कंधारकडे जाणाऱ्या बसमध्ये मोफत चे तिकीट देण्यास सांगितले वाहकास शंका आल्याने त्याने ते आधार कार्ड तपासले असता ते मोफत च्या नियमात बसत नसल्याने वाहकाने त्यास पुर्ण तिकीट घेण्यास सांगितले. तेव्हा त्या प्रवाशाने बस काय तुझ्या बापाची आहे का? सवलत देणारे वेडे आहेत का? असे बोलून वाहकास प्रवासीकडून शर्ट धरून शिवीगाळ आणि थापड बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी कंधार पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देशामध्ये सोमवारपासून तीन नवीन फौजदारी कायदे लागू करण्यात आले.नव्या कायद्यानुसार कंधारमध्ये बस वाहकास मोफत चे कार्ड असून तिकिटाचे पैसे का मागतोस असे म्हणून शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, शिवीगाळ करणे आणि मारहाण केल्याप्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि ३ जुलै रोजी बुधवारी कंधार आगारातून बस क्रमांक एम एच २० बी एल १७३८ चालक व्यंकट डांगे यांनी सकाळी साडेसात वाजता घोडज, संगमवाडी, उंमरज मार्गे जाऊन परत प्रवासी घेऊन येत असताना ९.५० वाजता पातंगापाटी येथून बस मध्ये बसलेल्या प्रवासी सूर्यकांत माणिका किरतवाड रा. पातळगंगा यास तिकीट घेण्यास सांगितले. तेव्हा त्यांने त्यांचे आधार कार्ड दाखवून मोफत चे तिकीट देण्यास सांगितले वाहकास शंका आल्याने त्याने ते आधार कार्ड तपासले असता ते मोफत च्या नियमात बसत नसल्याने वाहकाने त्यास पुर्ण तिकीट घेण्यास सांगितले. तेव्हा त्या प्रवाशाने बस काय तुझ्या बापाची आहे का? सवलत देणारे वेडे आहेत का? असे बोलून वाहक संतोष अरुण कंधारे यास शर्ट धरून शिवीगाळ आणि थापड बुक्क्यांनी मारहाण केली. सदरची घटना चालक व्यंकट डांगे व प्रवाश्यांनी सोडवा सोडवा केली. सदरील घटना पातळगंगापाटीपासून दोन किलोमीटर जवळ असलेल्या काशीराम तांडा जवळ घडली आहे. याप्रकरणी वाहक संतोष



अरुण कंधारे यांच्या तक्रारीवरून नव्या कायद्यानुसार कंधार पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. देशात सोमवारपासून ३ नवीन फौजदारी कायदे लागू झाले. संसदेत नव्याने मंजूर करण्यात आलेल्या कायद्यामध्ये अनेक बदल करण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(१), ३५२ भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, पोहेकॉ बी एम व्यवहारे करीत आहेत.

# व्हॉईस ऑफ मिडीयाचे खुलताबाद तहसीलसमोर धरणे

## तहसीलदारांना निवेदन : पत्रकारांच्या वसाहतीसाठी गायरान जमिनीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



खुलताबाद : पत्रकारांच्या महत्वाच्या विषयांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने दैनिक, साप्ताहिक, टीव्ही, रेडिओ या वेगवेगळ्या विभागांतील विषयाला घेऊन तालुक्यातील पत्रकारांनी चार जुलै रोजी खुलताबाद तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. पत्रकारांच्या न्याय हक्क मागण्यासाठी झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर पाटील व तालुका अध्यक्ष विजय चौधरी यांनी केले. तहसीलदार स्वरूप कंकाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खुलताबाद तालुक्यातील पत्रकारांच्या वसाहती साठी गायरान जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, शासन, राज्य सरकार छोट्या छोट्या दैनिकांना, साप्ताहिकांना सावत्रपणाची वागणूक देत आहे, हे मागच्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिसून आले. येत्या विधानसभा निवडणुकीला याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया' हजारो पत्रकारांना घेऊन रस्त्यावर उतरत आहे. व्हॉईस ऑफ मिडीयाचे खुलताबाद तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले असून पत्रकारांच्या न्याय हक्क मागण्यासाठी तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्हॉईस ऑफ मीडियाचे खुलताबाद तालुका अध्यक्ष विजय चौधरी यांनी सांगितले की, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, मुख्य संयोजक तथा कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर, साप्ताहिक विंगचे प्रदेशाध्यक्ष, संयोजक साप्ताहिक विंगचे कय्युम अब्दुल रशीद,वामन पाठक,रोहित जाधव, छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष सतीश रेंगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनात तालुक्यातील पत्रकार बांधव, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे पदाधिकारी, सदस्य यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खुलताबाद तहसील कार्यालयासमोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर तहसीलदार स्वरूप कंकाळ यांना निवेदन देण्यात आले. या संदर्भात शासनाचे वारंवार लक्ष वेधूनही ठोस अशी भूमिका न घेतल्यामुळे 'व्हॉईस ऑफ मीडिया' हे पाऊल उचलत आहे.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर पाटील, तालुका अध्यक्ष विजय चौधरी, उदय खरोटे, रामलाल निंभोरे, शेख कलीमोद्दीन, सय्यद इरफान, संतोष करपे, रमेश माळी, सलमान खान, बाबासाहेब दांडगे, शेख नाविद, बशिरोद्दीन शहाबुद्दीन, अशोक अधाने, रमेश अधाने, सुभाष शिंदे उपस्थित होते.

व्हॉईस ऑफ मीडिया'च्या मागण्या खालील प्रमाणे विधानसभा निवडणुकीत, सणवार, उत्सव या काळात यादीवरील सर्व छोटे दैनिक, सर्व साप्ताहिक, लोकाभिमुख असलेल्या न्यूज पोर्टल, यूट्यूब चॅनलला पण देण्यात याव्यात. सर्वांना समान न्यायाने जाहिरातीचे वाटप करण्यात यावे. शासनाकडून देण्यात येणाऱ्या जाहिराती दैनिकाप्रमाणे साप्ताहिकांनाही देण्यात याव्यात. वर्गवारीनुसार अन्याय करण्यात येऊ नये. आर. एन. आय. कडून नवीन नियमावलीनुसार लादण्यात आलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात. रेल्वे प्रवासासाठी अधिस्वीकृती धारकांना पुन्हा सवलत सुरू करावी.२५ वर्ष पूर्ण केलेल्या साप्ताहिक वृत्तपत्रांना द्वैवार्षिक तपासणीतून वगळण्यात यावे. तसेच २५ वर्ष पूर्ण केलेल्या साप्ताहिक वृत्तपत्रांना वर्धापन दिनाची विशेष जाहिरात देण्यात यावी. टीव्हीमध्ये काम करणाऱ्या स्टींजर, पत्रकारांचा मानधना संदर्भातला ठोस निर्णय घ्यावा. एका बातमीसाठी चार वर्षापूर्वी एक हजार रुपये मिळायचे, आता दोनशे रुपये मिळतात. टीव्हीच्या टीआरपी स्पर्धेमुळे टीव्हीत काम करणारा प्रत्येक पत्रकार आज हैराण आहे. याचे कारण टीआरपी आहे. टीआरपीची जीवघेणी स्पर्धा बंद करण्यात यावी आणि टीव्हीत काम करणाऱ्या पत्रकाराला वाचवावे. वर्तमानपत्रांमध्ये मिळणाऱ्या छोट्याशा मानधनावर पत्रकारांचे घर चालत नाही, त्यामुळे या मानधना संदर्भात ठोस निर्णय घेण्यासंदर्भामध्ये कमिटी स्थापन करावी. त्या कमिटीच्या सूचनेप्रमाणे पत्रकारांचे मानधन ठरवण्यात यावे. सध्या असलेल्या आयोगाचे नियम कोणीही पाळत नाही. पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासंदर्भामध्ये असणारी कमिटी, तसेच अधिस्वीकृती कमिटी संदर्भामध्ये असणारा जुना जीआर रद्द करून नवीन जीआर तयार करावा. राज्यात चांगले काम करणाऱ्या पत्रकारांच्या संघटनांना 'त्या' कमिटीवर काम करण्यासंदर्भामध्ये संधी द्यावी. सर्वच वृत्तपत्रांचे २५ टक्के जाहिरात दर सरसकट वाढवून देण्यात यावेत. कलर जाहिरातींचा प्रीमियमही वाढून देण्यात यावा. सरकारी आणि खाजगी या दोन्ही रेडिओमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनाच्या बाबतीमध्ये शासनाने नियमावली ठरवून द्यावी. काळाप्रमाणे डिजिटल मीडियाने आपले पाऊल जोरदार टाकलेले आहे. जे न्यूज पोर्टल, न्यूज यूट्यूब चॅनल लोकाभिमुख, अधिक लोकांपर्यंत पोहोचलेले आहेत, त्यांना शासनाच्या यादीवर घेण्यात येऊन त्यांना शासकीय जाहिराती देण्यात याव्यात. सेवानिवृत्ती योजनेची वाढवलेली रक्कम येत्या महिन्यापासून देण्यात यावी. जे जे श्रमीक आहेत त्यांना राज्य शासनाच्या सेवानिवृत्ती योजनेचा लाभ मिळावा. या प्रमुख मागण्या आहेत. हे आंदोलन शांततेच्या मार्गाने होणार आहे. या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने त्वरित नियमावली नाही केली तर येत्या दहा जुलैला मंत्रालया समोर पुन्हा आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने देण्यात आला आहे.



# विद्यार्थ्यांनो लैंगिक अत्याचाराविरुद्ध ११२ नंबरवर पोलिसांशी संपर्क करा

## पीएसआय भरत दाते यांचे आवाहन !

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** ता . जामनेर संपूर्ण देशभरात १ जुलै २०२४ पासून 'भारतीय न्याय संहिता २०२३ ' नवीन कायदे प्रणाली सुरू झाली असून शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना कायद्याचे ज्ञान व्हावे ,यासाठी पहूर पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भरत दाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की , १८ वर्षाखालील बालकांनी दुचाकी चालवू नये . तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधात्मक कायद्या ( पोस्को )अंतर्गत विद्यार्थ्यांनी काही चुकीचे वर्तन आपल्या बाबतीत घडत असल्यास तात्काळ ११२ नंबर डायल करून पोलीसांशी संपर्क साधावा .सायबर क्राईम विषयी बोलताना त्यांनी सांगितले की , सोशल मीडियाचा जपून वापर करावा . फोन पे ,गुगल पे सारख्या प्रणालींचा अत्यंत कमी आणि आवश्यक तेथेच उपयोग करून आपला पासवर्ड तसेच ओटीपी कोणासही शेअर करू नये ,असे सांगून त्यांनी सजग नागरिक घडण्यासाठी आपण दक्ष राहिले , असे आवाहन केले. सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तका बाहेरील अवांतर पुस्तकांचे वाचन करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. समाजात नीतिमूल्यांची होत असणारी घसरण थांबवण्यासाठी विद्यार्थ्यांनी कायद्याचे ज्ञान मिळवावे आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांसाठी कसा करता येईल ?याचाही विचार विद्यार्थ्यांनी करायला हवा , असे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संचालक तथा महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे माजी अध्यक्ष लक्ष्मण गोरे होते . ते म्हणाले की , आपण कोणासही न भिता आपल्यावर झालेला न्याय दूर करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे . त्यासाठी मुख्याध्यापिका , शिक्षक , शिक्षिका यांच्याशी संपर्क साधावा . प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही .व्ही . घोंगडे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मण गोरे व प्रमुख वक्ते पोलीस उपनिरीक्षक भरत दाते यांचा स्नेहवस्त्र आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार केला . सूत्रसंचालन पर्यवेक्षिका कल्पना बनकर यांनी केले .आभार बी .एन . जाधव यांनी मानले . यावेळी गोपनीय विभागाचे गोपाल गायकवाड , सागर गायकवाड , शाळेचे सांस्कृतिक प्रतिनिधी शंकर भामरे यांची प्रमुख उपस्थिती होती .याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे पोलीस उपनिरीक्षक भरत दाते यांनी निरसन केले. दहावीचे विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी वसंतराव देशमुख यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**भोकरदन :** पिंपळगाव रेणूकाई येथे दिनांक 3/ 7/ 2024



रोजी पिंपळगाव रेणुकाई ता. भोकरदन जि. जालना येथे भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचा विदर्भ -मराठवाडा विभागीय मेळावा संपन्न झाला आहे. या मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष माननीय प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा हे प्रामुख्याने हजर होते. मेळाव्यात उपस्थित पदाधिकारी व नागरिकांना संबोधित करतांना राष्ट्रीय अध्यक्षांनी राज्यसह देशात सर्वच क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार बोकाळला असून सामान्य जनतेला जगणं कठीण झालेलं असल्याच त्यांनी सांगितल. त्यांनी पुढे बोलताना सांगितले की, संपूर्ण देशभरामध्ये अवैध धंदे व अवैध देशी दारूची विक्री जोरात सुरू असून अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत.

हे कुठेतरी थांबले पाहिजे यासाठी संघर्ष समितीने पुढाकार घेऊन अशा अवैध धंद्याच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. संपूर्ण देशामध्ये अवैध गुटखा विक्री, अवैध दारू विक्री, बनावट देशी दारू विक्री असे अनेक प्रकार घडत आहेत.आणि पोलीस व दारूबंदी अधिकारी यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या विषयी बोलत असतांना शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक ही थांबली पाहिजे स्थानिक गाव पातळीवर तलाठी, ग्रामसेवक व मंडळ अधिकारी यांच्याकडून शेतीचे दस्तऐवज घेण्यासाठी शेतकऱ्यांना हजारो रुपये मोजावे लागतात ही बाब शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार अन्यायकारक व चीड आणणारी आहे. कोणताच तलाठी पैसे घेतल्याशिवाय शेतकऱ्यांची काम करत नाही त्यांना शेतीसंबंधी कुठलीच कागदपत्रे देत नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. अशा भ्रष्ट ग्रामसेवक, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यावर भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच सर्वच नागरिकांनी बारीक लक्ष ठेवून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासंबंधी वरिष्ठ अधिकाऱ्यांना धारेवर धरणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे. कुठल्याच शासकीय कार्यालयामध्ये गेल्यानंतर सर्वसामान्य जनतेची काम पैसे घेतल्याशिवाय होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

अशावेळी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे धाव घेतली असता ते सुद्धा अशा गुन्हेगारांना पाठीशी घालतात त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई करावी. आपल्यातलेच काही फितूर त्यांना सहकार्य करीत असून आपल्याच लोकांची पिळवणूक करत असल्याचा खेद त्यांनी यावेळी व्यक्त केला. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतभर कार्यरत आहे .भारत सरकार प्रमाणित ही संघटना असल्यामुळे संपूर्ण देशामध्ये संघटनेचे पदाधिकारी कार्यरत आहेत. देशात काण्या- कोपऱ्यात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे कार्य जोमाने सुरू असून भ्रष्टाचाराचे विरोधात लढणारी ही एकमेव राष्ट्रीय संघटना आज कार्यरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती म्हणून अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री पंडितराव तिडके,प्रदेशकार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य श्री वसंतराव देशमुख ,मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री शंकररावजी देशमुख ,अमरावती विभागीय कार्याध्यक्ष श्री किरण लहाने यासोबतच छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाध्यक्ष श्री जगताप, जालना जिल्हा अध्यक्ष श्री कृष्णा लहाने, जालना जिल्हा सचिव श्री मुरलीधर डहाके, जाफराबाद तालुका अध्यक्ष श्री रामदास कदम, भोकरदन तालुका अध्यक्ष श्री बाळासाहेब देशमुख, भोकरदन तालुका उपाध्यक्ष श्री सुनील उंबरकर, जालना जिल्हा उपाध्यक्ष श्री शालिक्राम आहेर, श्री डिगांबरराव जाधव भोकरदन,जालना जिल्हा उपाध्यक्ष गणेशराव तौर, लहान जिल्हाध्यक्ष श्री देवेंद्र मिसाळ, बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख श्री अंकुश डहाके यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.यावेळी संघटनेच्या माध्यमातून अनेक सतत कार्यरत व संघटनेच्या कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे राज्याचे प्रदेश श्री वसंतराव देशमुख यांच्या कामाची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये श्री वसंतराव देशमुख यांना अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष पदावर निवड केली व तसे नियुक्ती पत्र त्यांना या मेळाव्यात देण्यात आले.

# सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यावर १७ लाख ८४ हजारांच्या अपसंपदेचा गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** पशुवैद्यकीय दवाखान्यातील सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यावर सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १५ लाख ८४ हजाराची अपसंपदा जमवल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. दिलीप महादेव नाझीरकर असे संशयिताचे नाव आहे. फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक विक्रम पवार यांनी फिर्याद दिली आहे. दि. १९ जून २०११ ते दि.७ सप्टेंबर २०१९ दरम्यान सहाय्यक पशुधन विकास अधिकारी नाझीरकर यांनी बरड (ता फलटण) व इतर ठिकाणी आपल्या पदाचा गैरवापर करून ज्ञात स्त्रोतापेक्षा (एकूण उत्पन्नाच्या २५.७ टक्के) १७ लाख ८४ हजाराची अपसंपदा जमवल्याचे निष्पन्न झाले असल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हटले आहे. अपसंपदा बाळगल्याप्रकरणी नाझीरकर यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक राजेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी तथा पोलीस निरीक्षक सचिन राऊत, विक्रम पवार यांच्यासह एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली. पाच दिवसांपूर्वीच एसीबीने सातारा पालिकेतील आरोग्य निरीक्षक प्रवीण यादव यांच्यावर देखील ११ लाखांची अपसंपदा जमवल्याचा गुन्हा दाखल केला होता.

# 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवावे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे. या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती



करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत.

त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करून देणे किंवा फॉर्म भरून देण्याचे निमित्त करून निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत 31 ऑगस्ट 2024 पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करून योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला 18 हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या गावाच्या, पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहील

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विधासभेत ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत किंवा जखमींच्या मदतीबाबत शासन गंभीर असून पीक नुकसान भरपाई मर्यादा 6000 वरून 50 हजार रुपये करण्यात आली तर वन्यप्राणी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना आता 25 लक्ष रुपये मदत शासनाकडून दिली जात असून वनांचे संरक्षण, पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या गावाच्या, गावाकऱ्याच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहील अशी माहिती वन सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत देत, वनविभागाने स्थापन केलेल्या आमदारांच्या अध्यक्षतेखालील तालुका समित्यांमध्ये झालेल्या निर्णयाची, सुचनांची गांभीर्याने दखल घेतली जाईल, असे आश्वासन देखील ना. मुनगंटीवार यांनी सभागृहात दिले.

आमदार रणधीर सावरकर, एड. आशिष जयस्वाल, अतुल बेनके इत्यादी सदस्यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधीला ना. मुनगंटीवार उत्तर देत होते. रानडुक्कर व रोहींमुळे होणारे नुकसान या संदर्भात बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले की, रानडुक्कर व रोहीना मारण्याचे अनुमती शासनाने यापूर्वीच दिलेली आहे. वनविभागाशी संबंधित समस्या, अडचणी यावर वनविभाग आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये समन्वय असावा म्हणून 2019 मध्ये आमदारांच्या अध्यक्ष झाली समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. या आमदार महोदयांनी बैठक घेऊन कामामध्ये तिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्याला दंडित करण्याचा नियम देखील केला आहे, असे ना. मुनगंटीवार म्हणाले. वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण व्हावे यासाठी कुंपण करण्याची योजना वनविभागाने प्रस्तावित केलेली आहे; 28, 499 लाभार्थिंची ऑनलाइन नोंदणी झाली असून वनवृत्ताच्या आसपास, बफर झोनच्या जवळील गावांना कुंपण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून 15 हजार रुपये "डिबीटी" मार्फत देण्यात येत आहेत. एक लक्ष लाभार्थी या योजनेसाठी अपेक्षित आहे असे स्पष्ट करून ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना 30 दिवसात नुकसान भरपाई देण्याचा कायदा केला असून,सॉफ्टवेअर केले आहे असे सांगितले.

आ. अतुल बेनके यांनी उपस्थित केलेल्या बिबट्याच्या नसबंदी बाबत बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले, बिबट्याची व वाघाची वाढती संख्या हा विषय गंभीर आहे. नसबंदी संदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला असून राज्य वन विभागाने यासाठी पिंजऱ्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. यासोबतच याविषयीचे कार्यवाहीचे डिसिएफ कडे देण्याचा निर्देश देण्यात आले आहेत. जुन्नर क्षेत्रात बिबट सफारी घेतला असून बिबट्याच्या प्रश्नाबाबत शासन सकारात्मक विचार करेल असेही त्यांनी सांगितले.

पर्यावरणाचे, वनांचे रक्षण करणारे गाव, गावकरी यांना संरक्षण देण्यासाठी सरकार अनुकूल असून कारण नसताना गरीब माणूस वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडतो हे अत्यंत दुर्दैव आहे, त्यांच्या कुटुंबीयांना नोकरी देण्यासंदर्भात देखील सरकार अनुकूल असून याविषयी प्रस्ताव तयार करण्याचा विचार आहे असे ते शेवटी म्हणाले.



# पिडितांना न्याय मिळवून देण्यासाठी जुन्या कायद्यात बदल : न्यायाधीश पिंपळकर

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**
**मुखेड :** न्याय प्रक्रियेतील जुन्या कायद्याच्या संकल्पनेत आज पासून करण्यात आलेले बदल हे गतीमान न्याय प्रणालीसाठी मैलाचा दगड ठरतील व पिडीत व्यक्तींना अधिकाधिक दिलासा कसा मिळेल या बाबींचा समावेश यात करण्यात आलेला आहे. हा बदल स्वीकारण्यासाठी प्रशासकिय,न्यायिक यंत्रणा सज्ज झाल्या असून नागरिकांनी सुद्धा यात सहभागी होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मुखेड न्यायालयाचे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश पिंपळकर यांनी केले दि.०१ जुलै पासून देशात सुरू होणाऱ्या तीन नवीन कायदा प्रणालीतील बदलाची संकल्पना समजून घेण्यासाठी आर्य वैश्य मंगल कार्यालयात पोलिस स्टेशन मुखेडच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर दिवाणी न्यायाधीश अभ्यंकर,न्यायाधीश किशोर मुंडे, नायब तहसीलदार पी.डी.गंगनर, सहाय्यक सरकारी वकील सोमनाथ वरपे, एस.डी.चौरे आदींची उपस्थिती होती. व्यासपीठावरील मान्यवरांनी जूने फौजदारी प्रक्रिया संहिता, साक्षी पुरावा कायदा,भारतीय दंड विधान व भारतीय न्याय संहिता, भारतीय न्याय सुरक्षा कायदा, भारतीय पुरावा कायदा यातील प्रमुख बदल याबाबत सखोल मार्गदर्शन केले. पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पोलिस पाटील विनोद कोटीवाले यांनी केले. कार्यक्रमासाठी पोलिस उपनिरीक्षक मंचक फड, गोपनीय शाखेचे पांडुरंग पाळेकर, पोकॉ किरण वाघमारे,पोकॉ सिद्धार्थ वाघमारे, ॲड. सुनिल पौळकर, अनिल कांबळे, गणेश पवार, शिंदे यांच्यासह पोलिस पाटील, होमगार्ड, राजे छत्रपती अकॅडमीचे विद्यार्थी, पत्रकार यांची उपस्थिती होती.

# वृत्तपत्र क्षेत्रातील कर्मचारी व कुटूंबीयांसाठी पत्रकार भवनमध्ये मोफत नेत्र तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** साई सूर्य नेत्रसेवा, अहमदनगर येथील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांचे शनिवार, दि.६ जुलै २०२४ रोजी सकाळी १० ते १२ पत्रकार भवन, मनमंदिर ट्रॅव्हल्समागे, अदालतरोड, बाबा पेट्रोपपंप, छत्रपती संभाजीनगर येथे विविध क्षेत्रातील पत्रकार, वृत्तपत्रातील कर्मचारी व कुटूंबीयांसाठी पत्रकार भवन मध्ये मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन, संबंधितांनी प्रत्यक्ष नोंदणीसाठी आपले ओळखपत्र सोबत आणावे. शिबीरात फक्त मोतीबिंदू, काचबिंदू, तिरळेपणा व चष्मा कायमचा घालविण्यासाठी असलेल्या नेत्र रुग्णांची तपासणी करुन त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले जाईल. शिबीराचे उद्‌घाटन ज्येष्ठ पत्रकार श्री. नागनाथ फटाले यांचे हस्ते होणार असुन या शिबीराचा फायदा संबंधितांनी घ्यावा असे आवाहन संयोजका तर्फे करण्यात आले आहे. 'काँटूरा व्हिजन' या प्रगत तंत्रज्ञानानेव्दारे कोणत्याही प्रकारच्या गुंतागुंतीच्या दृष्टी समस्यांवर उपचार व चष्म्याचा नंबर पूर्णपणे घालविता येणे शक्य झाले आहे. तसेच बदलत्या जीवन शैली मुळे लहानमुलांना मोठ्या नंबरचा चष्मा लागण्याचे प्रमाण वाढले असुन या दृष्टीदोषांवर सुध्दा नवीन तंत्रज्ञानाने उपचार सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. लहान मुलांच्या या दृष्टीदोषांवर आताच उपचार केल्यास भविष्यात त्यांना त्यांच्या करिअरसाठी दृष्टी दोषाच्या अडचणीमुळे अडथळा निर्माण होणार नाही. तरी या शिबीरात संबंधितांनी सहभागी व्हावे असे करण्यात आले आहे.

# तलाठी भिसेंना निलंबित करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** मौजे येवती येथील तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, मंडळ अधिकारी, कृषी अधिकारी यांनी संगणमत करुन खोटे कुटूंब दाखवुन गैर व्यवहार केले असल्यामुळे चौकशी कर जुलै 2023 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये घरात पाणी शिरून बाधित झालेल्या बाधितांना अनुदान वाटपातील 353 लाभार्थ्यांपैकी 19 लाभार्थी यांचेकडून तातडीने वसुलीची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. तसेच सबंधित गावचे मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक यांचे खुलासाच्या अनुषंगाने आपले स्तरावर निर्णय घेण्यात येवून, दोषी कर्मचा-यांविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करणेस्तव कळविले होते. तथापी अद्याप वसुली केल्याचे दिसून येत नाही. जुलै 2023 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये घरात पाणी शिरून बाधित झालेल्या बाधितांना अनुदान वाटपातील 353 लाभार्थ्यांपैकी 19 लाभार्थी यांचेकडून वसुली केली नाही तसेच संबंधिततांचे खुलासे सादर न केल्यामुळे श्रीमती एस. व्ही. चेवटे मंडळ अधिकारी येवती , एन. एस. भिसे तत्कालीन तलाठी येवती, देविदास जोगपेठे विस्तार अधिकारी येवती , जी.एस.पवळे ग्रामसेवक येवती व एस.जी.गीरी कृषी सहायक येवती यांचे विरुध्द शिस्त भंग विषयक कार्यवाही प्रस्तावित करणेस्तव कळविले आहे. वसुलीबाबत अत्यंत निष्काळजीपणा दिसून येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, नैसर्गिक आपत्ती सारख्या अत्यंत संवेदनशील प्रकरणात जाणीवपूर्वक दूर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. उक्त नमूद 19 लाभार्थी यांचेकडून तातडीने वसुलीची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी. तसेच आपले स्तरावर निर्णय घेवून, दोषी कर्मचा-यांविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव (दोषारोप पत्र 1 ते 4 नमुने व आवश्यक कागदपत्रासह) नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावे.

# वटवृक्षाविषयी वादाची आदित्य ठाकरेंकडून दखल, मारहाणीची वृक्षप्रेमींकडून तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहरातील गंगापूर रस्त्यावरील प्राचीन वटवृक्ष वाचविण्यासाठी जमलेल्या पर्यावरणप्रेमींना मंगळवारी सुनावणीसाठी जमलेल्या एका गटाने मारहाण केली. अकस्मात घडलेल्या या घटनेने धास्तावलेल्या वृक्षप्रेमींनी पोलिसात धाव घेतली. वृक्षप्रेमींनी मद्यपान करून वाहन चालविले जात असल्याने अपघात घडतात, असे विधान केल्यामुळे स्थानिक रहिवासी चिडले. वृक्ष हटविण्याचे समर्थक आणि विरोधक यांच्यात बाचाबाची होऊन वाद झाले. आपण मध्यस्थी करून वाद मिटवला, असा दावा ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांनी केला. या घटनाक्रमाची तक्रार वृक्षप्रेमींनी माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे केल्यानंतर हा प्रकार घडल्याचे सांगितले जाते.

गंगापूर रस्त्याच्या मध्यभागी तसेच लगत काही वृक्ष आहेत. या वृक्षांना धडक बसून अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. न्यायालयाने स्थानिकांचे म्हणणे जाणून रस्त्यातील झाडांबाबत निर्णय घेण्यास सांगितले आहे. त्या अनुषंगाने महापालिकेने रस्त्यातील वटवृक्षाबाबत नागरिकांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी मंगळवारी हरकती व सूचना मांडण्याचे आवाहन केले होते.

# कापसाच्या हमी भावाची तफावत भरुन काढत सी – 2 सूत्रानुसार शेतकऱ्यांना 9 हजार 354 इतका हमीभाव द्यावा

## अधिवेशनात बोलताना शेतकऱ्यांच्या अडचणींवर आ. जोरगेवार यांनी वेधले लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्र सरकारने ए-2, एफ एल सूत्रानुसार कापूस उत्पादक शेतकऱ्यांना 7 हजार 521 हमीभाव दिला आहे. हा अन्याय आहे. त्यामुळे सी-2 सूत्रानुसार निर्धारित होणारा 9 हजार 354 इतका हमीभाव शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. यात निर्माण होणारी 1 हजार 833 रुपयांची तफावत राज्य सरकारने भरून काढत शेतकऱ्यांना 9 हजार 354 इतका हमीभाव द्यावा, अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.



आज अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी सभागृहात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांच्यापुढे मांडले आहेत. चंद्रपूरातही कापूस उत्पादक शेतकरी आहेत. यापूर्वी कापूस उत्पादक तालुक्यातून चंद्रपूरचे नाव वगळण्यात आले होते. त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर तालुक्याचे नाव कापूस उत्पादक तालुक्यात समाविष्ट करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. परिणामी, चंद्रपूर तालुक्याचे नाव कापूस उत्पादक तालुक्यांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले. आज अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, स्वामिनाथन आयोगाने सुचविल्या नुसार ए-2, ए-2 प्लस, एफ एल आणि सी-2 या तिन सूत्रांनुसार उत्पन्नाचा खर्च मोजला जातो. यात ५० टक्के नफा जोडल्या जातो,  परंतु शासनाने हमीभाव ठरविताना ए-2, एफ-एल सूत्रानुसार 7 हजार 521 इतका हमीभाव कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिला आहे. मात्र सी-2 या सूत्रानुसार शेतकऱ्यांना हमीभाव देणे अपेक्षित आहे. यानुसार  9 हजार 354 इतका हमीभाव कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे. परंतु असे झाल्यास 1 हजार 833 रुपयांची तफावत निर्माण होणार आहे. ही तफावत राज्य सरकारने भरून काढावी, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. यावर उत्तर देताना कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी अर्थमंत्री अजित पवार यांनी तशी घोषणा केल्यास ही तफावत राज्य सरकार भरेल, असे सकारात्मक उत्तर दिले आहे.

ग्रेडर कमी असल्याने कापसाच्या गाड्या विक्री केंद्रावर दोन ते तीन दिवस थांबविल्या जात आहेत. ही कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोरील मोठी अडचण आहे. त्यामुळे ग्रेडरची संख्या वाढवून पहिल्याच दिवशी कापसाचे ग्रेडेशन करून शेतकऱ्यांचा कापूस विकत घेणार का, असा प्रश्न अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थित केला आहे.



# जि.प. हायस्कूलचे मुख्याध्यापक कांबळे यांना सेवानिवृत्तीबद्दल निरोप

## दहावीच्या परिक्षेत यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**संजय कांबळे**

**मुखेड :** जि.प. मुलींचे हायस्कूलचे मुख्याध्यापक एम.आर. कांबळे हे नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळेच्या मेन प्रवेशद्वारापासून ढोलताशाच्या गजरात वाजत-गाजत त्यांना कार्यक्रमास्थळी आणुन त्यांचे औक्षण करत सपत्नीक कपडेरुपी आहेर करुन भेटवस्तू देवून सेवानिवृत्तीबद्दल यथोचित सत्कार केले व निरोप देण्यात आला.यानंतर दहावी बोर्डच्या परिक्षेत नेत्रदीपक यश संपादन केलेल्या जि.प.हायस्कूल मुलींचे मुखेड प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांनीचा प्रशालेच्या वतीने सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पहार व लेखणी भेट देवून सत्कार करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सेवानिवृत्ती गौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेताब शेख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मार्केट कमीटीचे माजी सभापती व्यंकटराव पाटील दापकेकर, तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी कैलास होनधरणे, उपाध्यक्षा सौ.उर्मिला गिते,शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठलराव वडजे, बाळासाहेब कदम, शिवाजीराव येवतीकर, सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी एन.एस. गायकवाड,लसाकमचे राज्याध्यक्ष बालाजी थोटवे,केंद्रप्रमुख डॉ.शिवाजी कराळे, मधुकर गायकवाड,श्रिपत वाडीकर, मुख्याध्यापक डी.जे.कांबळे, सांस्कृतीक विभागप्रमख दिलीप देवकांबळे यांच्यासह अनेक मान्यवर व शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.सदर कार्यक्रमाची सुरुवात महापुरूषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी अनेकांनी मनोगत व्यक्त केले.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहशिक्षिका सौ.सुरेखा हराळे,सौ.सविता उमाटे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना सहशिक्षक कल्याण इंगळे यांनी केले.उपस्थितांचे आभार माध्यमिकचे शिक्षक डॉ. बरकत उल्ला यांनी मानले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक,विषयतज्ञ, मोबाईल टीच्चर,शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी,सदस्य,मुख्याध्यापक कांबळे यांच्या परिवारातील सदस्य,नातेवाईक,मित्रपरिवार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी जि.प.हायस्कूल मुलींचे मुखेड प्रशालेतील सर्व शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आवक घटल्याने टोमॅटोचे दर वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** आधी दुष्काळ आणि नंतर अवकाळीने टोमॅटोची स्थानिक पातळीवरील आवक घटली आहे. याचा परिणाम मुंबईला रोज पाठविल्या जाणाऱ्या मालावर झाला आहे. यामुळे बाजारातील दर किलोला शंभरच्या आसपास आहेत. यंदा उन्हाचा पारा चाळिशीच्या वर राहिल्याने टोमॅटोच्या उत्पादनास त्याचा मोठा फटका बसला आहे. यंदा या वाढत्या तापमानामुळे उन्हाळी लागवडीतील टोमॅटोच्या रोपांना फुटवे कमी प्रमाणात आले. ऊनपावसाच्या खेळाने करपा रोगाची लागण झाली. झाडांची उंची चांगली न वाढता रोपे खुरटी राहिली. याचा परिणाम उत्पादनावर होत यंदा मोठी घट झाली आहे. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीत १० ते १५ हजार जाळ्यांची (एक जाळी – २० किलो) आवक होत असते. सध्या हे प्रमाण तीन हजार जाळ्यांवर आले आहे. घाऊक बाजारात क्विंटलला सरासरी चार हजार रुपये दर आहे. पावसामुळे मालाच्या दर्जावरही परिणाम झाला आहे. जिल्ह्यातील आवक कमी झाल्याने काही व्यापारी संगमनेर परिसरातून किरकोळ विक्रीसाठी माल आणत आहेत. उन्हाळ्यात लागवड झालेला माल सध्या बाजारात येत आहे. नाशिकच्या बाजार समितीत सध्या टोमॅटोची ८० टक्के आवक कमी झाल्याचे सभापती देविदास पिंगळे यांनी सांगितले. कधी तप्त उन्हाचा तडाका, मधेच पावसाचा अवकाळी फटका तर कधी गारपिटीची आपत्ती यामुळे शेती व्यवसायाचे सगळे गणितच सध्या बिघडले आहे. यावर्षी उन्हाळ्यामध्ये पारा चांगला तापला होता. कोल्हापूरसारख्या आल्हाददायक जिल्ह्यातही यंदा अनेक दिवस तापमान ४० अंश सेल्सिअसच्याही वर राहिले.



# वरिष्ठ सहाय्यक बोंबले सेवानिवृत्त, विविध विभाग कर्मचाऱ्यांकडून भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे येसगाव नं दोन येथील बोंबले हे जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालयांत वरिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत होते ते सेवानिवृत्त झाल्यानें त्यांचा विविध कार्यालय विभागतील अधिकारी कर्मचारी यांच्या कडून भव्य सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद बांधकाम विभाग आणि सहारा सोसायटी तर्फे भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




# जय श्रीराम, जय शिवराय घोषणा देत कमल स्पोर्टिंग क्लबच्या वतीने राहुल गांधी यांचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या संसद सभागृहात काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी देशातील हिंदुना हिंसक प्रवृत्तीचे ठरवून समस्त हिंदुंचा अपमान केला असून संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तींने साऱ्या हिंदु समाजाला हिंसाचारी ठरविल्याने राहुल गांधीचा जाहीर निषेध करुन त्यांनी सकल हिंदु समाजाची लोकसभेच्या सभागृहातून माफी मागावी अशी मागणी कमल स्पोर्टींग क्लब, चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष रघुवीर अहीर यांनी केली आहे. चंद्रपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि. 03 जुलै, 2024 रोजी आयोजित निषेध कार्यक्रमात संबोधित करताना रघुवीर अहीर म्हणाले की, हिंदुंच्याच नव्हे तर सर्व जाती धर्म व पंथांच्या सामाजिक, सांस्कृतिक व सनातन चिरंतन मुल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचे त्यांच्या परंपरांचा सन्मान राखण्याचे व बंधुभाव जोपासण्याचे कर्तव्य हिंदु समाजाने सातत्याने केले असतांना हिंदुंना हिंसक अशी उपमा देवून राहुल गांधींनी सकल हिंदूंचा अपमान केला असून नैतिकता दाखवून त्यांनी माफी मागून प्रायश्चित घ्यावे असेही रघुवीर अहीर म्हणाले. यावेळी कॉंग्रेस नेते राहुल गांधींच्या निषेधाचे बॅनर झळकवून जय श्रीराम, जय शिवराय चे नारे देण्यात आले हिंदुना हिंसक ठरविणारे राहुल गांधी-मुर्दाबाद, राहुल गांधींचा निषेध असो अशा घोषणा उपस्थितांनी दिल्या. यावेळी राजवीर चौधरी, मयुर भोकरे, जगदीश दंडेले, शिवाजी वाकोडे, प्रणय डंभारे, चेतन शर्मा, संगम दहागावकर, राकेश वाकोडे, आशिष जामुनकर, आश्रय चंदनखेडे, सुमित बाकरवाले, प्रज्वल गिलबिले यांचेसह अनेक कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.



# आरटीई प्रवेश प्रक्रिया तात्काळ सुरू करावी : डॉ. अभिलाषा गावतुरे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** आरटीई प्रवेश प्रक्रिया तात्काळ सुरू करावे या करीता भूमिपुत्र ब्रिगेडचे डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना निवेदन दिले.

शाळांचे सत्र सुरू झाले आहे. मात्र, अद्यापही आरटीई प्रवेशाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. आरटीई प्रवेश रखडल्यामुळे गरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. शाळा सुरू होऊनही आपल्या पाल्याचा शाळेत प्रवेश झाला नसल्याने पालक चिंतेत पडले आहेत. आरटीई प्रवेश प्रक्रियेअंतर्गत खासगी शाळांमध्ये प्रवेशासाठी १६ मे पासून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असते.

प्रक्रियेअंतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत संपल्यानंतर शासन स्तरावर लॉटरी काढण्यात आली. परंतु सध्या आरटीई प्रवेशाचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार २५% प्रवेश लॉटरी सोडत जाहीर करण्यात येईल, असा संदेश शासनाच्या आरटीई प्रवेशाच्या संकेतस्थळावर देण्यात आला. तरीपण सत्र सुरू होऊन सुद्धा प्रवेश परीक्षा सुरू झालेली नाहीत.

तरीपण लॉटरी पद्धत लवकरात लवकर सुरू करून प्रवेश परीक्षा सुरू करावी या मागणीसाठी भूमिपुत्र ब्रिगेडच्या डॉ. अभिलाषा गावतूरे( बेहेरे), छायाताई सोनुले यांच्या द्वारे शिक्षणाधिकारी माध्यमिक आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी पालक नितीन लोणबले, डॉ. राकेश वनकर, विजय मुसळे, प्रवीण देऊळकर आणि सोनल भगत श्रीकांत मुरमुरवार आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुमारी दिपल पाटीलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** सरस्वती माध्यमिक विद्यालय, आकुर्डी पुणे, ३५ येथील कुमारी दिपल दिनेश पाटील ही पुणे जिल्हा शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी च्या गुणवत्ता यादीत झळकली. नवनगर शिक्षण मंडळाचे, सरस्वती माध्यमिक विद्यालय आकुर्डी पुणे, ३५ या विद्यालयाची कुमारी दिपल दिनेश पाटील ही पुणे जिल्हा शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी च्या गुणवत्ता यादीत झळकली त्याबद्दल तिचे संस्थेच्या,शाळेच्या,सर्व शिक्षकांच्या, पालकांच्या,वर्ग मित्रमैत्रिणीच्या, अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या वतीने हार्दिक-हार्दिक अभिनंदन !!! संस्थापक श्री. गोविंद दाभाडे सर यांनी तिला पुढील भविष्य वाटचालीस खूप-खूप शुभेच्छा दिल्या!!! तिला मराठी विषयाचे अध्यापन सौ.उभे मॅडम,गणित विषयाचे अध्यापन सौ.बनसोडे मॅडम व सौ.पाटील मॅडम, इंग्रजी विषयाचे अध्यापन सौ.प्रतिमा काळे मॅडम,तर बुद्धिमत्ता विषयाचे अध्यापन श्री.पवार सर व श्री.वांगेकर सर यांनी केले.या सर्व शिक्षकांचे तसेच तिच्या पालकांचे विशेष सहकार्य लाभले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# सेतुवर नागरिकांची झुंबड; रेशन केवायसी, बहीण लाडकी, शालेय कागदपत्रे

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** शासनाकडून सद्या रेशनची केवायसी करुन घेणे, नुकतेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा त्यात अनेक महिला पंढरपुरकडे,त्यात नुकतीच शाळा उघडली शालेय विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षासाठी विविध कागद पत्रांची पूर्तता आदि हे सर्व एकच वेळी आल्याने एकच गोधळ उडाला असुण नागरिकांची एकच पळापळ सुरू आहे. सद्या पुरवठा विभागांकडून कुटूंबाच्या रेशनकार्डातील



सदस्यांची ई-केवायसी प्रक्रिया सुरू आहे त्याला म्हणावे तसं प्रतिसाद मिळत नाही तोच नुकतेच शासनाने (सरकार) ने मुख्यमंत्री लाडकी बहीण महिलां साठी ची योजना जाहीर केली त्यासाठी लागणारे कागदपत्रांची जुळवाजुळव तर त्यात शाळा उघडल्याने शालेय विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी लागणारी कागदपत्रे हे कुटुंब प्रमुख महिला वा पुरुष यांनाच जुळवाजुळव करावी लागते हे एकच वेळी आल्याने नागरिकांची मोठी पळापळ सुरू आहे तर सर्वत्र सुते केंद्रावर झुंबड दिसून येत आहे.त्यात काही महिला व पुरुष पंढरपूराकडे गेलेले असल्याने ते तिकडे परेशान आहे.एकुण एकच वेळी विविध योजना कागदपत्रे जुळवाजुळव प्रक्रिया समोर असल्याने नागरिक सेतु केंद्र वर निव्वळ गोंधळ दिसुन येत आहे.